सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'वक्फ दुरुस्ती'ला मंत्रिमंडळाची मंजुरी संसदेत मांडले जाण्याची शक्यता




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नवी दिल्ली**

वक्फ दुरुस्ती विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी मंजुरी दिली. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा १० मार्च ते ४ एप्रिलपर्यंत चालेल. यादरम्यान वक्फ विधेयक संसदेत मांडले जाण्याची शक्यता आहे.

वक्फ विधेयकासाठी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) अहवालानुसार या विधेयकाचा नवा मसुदा तयार करण्यात आला आहे. यात ४४ दुरुस्त्यांपैकी एनडीएच्या सदस्यांनी मांडलेल्या १४ दुरुस्त्या स्वीकारण्यात आल्या होत्या. विरोधी पक्षांनी मांडलेल्या दुरुस्त्या फेटाळून त्या आधारे नवा मसुदा तयार करण्यात आला आहे.राज्यसभेत खा. मेधा कुलकर्णी यांनी तर लोकसभेत जेपीसीचे चेअरमन भाजप खासदार जगदंबिका पाल यांनी हा अहवाल सादर केला होता. यावर दोन्ही सभागृहांत विरोधकांनी आक्षेप नोंदवला होता. यावरून संसदेत गोंधळही झाला होता. विरोधकांनी सुचवलेली एकही दुरुस्ती मान्य केली नसल्याने विरोधक आक्रमक झाले होते.

**...म्हणून विधेयकाचे महत्त्व**

देशात वक्फ बोर्डाकडे सुमारे ९ लाख एकरहून अधिक जमीन आहे. म्हणजेच देशात रेल्वे आणि संरक्षण मंत्रालयानंतर सर्वाधिक जमीन असलेली वक्फ बोर्ड ही एकमेव संस्था आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदेंपाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठोपाठ आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही धमकी मिळाली आहे. आणि ती देखील थेट पाकिस्तानी नंबरवरून. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी देणारा व्हॉट्सॲप मेसेज मुंबई वाहतूक पोलिसांना आला आहे. मुंबईतील वरळी पोलिसांनी हा मेसेज मिळाल्यावर लगेचच गुन्हा दाखल करत तपासाला सुरुवात केली आहे. गेल्याच आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा ई-मेल पोलिसांना आला होता. हा मेल गोरेगाव, जे.जे. पोलीस स्टेशन, सीएमओ आणि मंत्रालय येथे पाठवण्यात आला होता. या प्रकरणातील संशयिताला गोरेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. तर त्यानेच कथितरित्या मेल पाठवल्याचे तपासात समोर आल्याचे मुंबई गुन्हे शाखेने सांगितले होते. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना देखील धमकी आल्याने सर्व यंत्रणा ॲलर्ट मोडवर गेल्या आहेत.



मुंबई ट्रॅफिक पोलिसांना हा धमकीचा मेसेज व्हॉट्सॲपद्वारे मिळाला आणि तोही पाकिस्तानी नंबरवरून. बुधवारी दुपारी हा मेसेज मिळाल्यानंतर पोलीस एकदम सतर्क झाले आहेत. हा मेसेज पाठवणाऱ्याचे नाव मलिक शाहबाज ह्मायूं राजा देव असे सांगितले जात आहे. हा मेसेज पाठवणारा व्यक्ती भारतात आहे की भारताच्या बाहेर आहे, याचा शोध घेतला जात आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सुरक्षा विभागाला पाकिस्तानी नंबरवरून आलेल्या या मेसेजची माहिती देण्यात आली आहे.

## बद्रीनाथ मंदिराजवळ भीषण दुर्घटना, हिमस्खलनामुळे ५७ कामगार गाडले गेले; १६ जणांना वाचवण्यात यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८चमोली**

उत्तराखंडमधील चमोली येथे हिमस्खलनामुळे ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उत्तराखंडच्या काही भागांत सुरू असलेल्या बर्फवृष्टी दरम्यान ही दुःखद घटना घडली आहे. वृत्तानुसार, चमोली येथील बद्रीनाथ धाम येथील माना गावाजवळील हिमनदीखाली गाडलेल्या ५७ कामगारांपैकी १६ कामगारांना वाचवण्यात यश आले आहे. उर्वरित ४१ कामगारांचा शोध सुरू आहे.



उत्तराखंडच्या मुख्य सचिव राधा रतुरी यांनी सांगितले की, चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथजवळील माना येथे हिमस्खल झाल्यामुळे ५७ कामगार गाडले गेले आहेत. त्यापैकी १६ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. उर्वरित कामगारांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.हे सर्व कामगार बीआरओशी करार केलेल्या कंत्राटदाराचे असल्याचे सांगण्यात येत आहे. चमोलीच्या काही भागांत गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत आहे. बद्रीनाथ मंदिरापासून तीन किलोमीटर अंतरावर महामार्गाजवळ हा अपघात झाला.या अपघातानंतर बचाव कार्यात तीन ते चार रुग्णवाहिका देखील सहभागी झाल्या आहेत. बचाव पथके हिमस्खलनाच्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र जोरदार हिमवृष्टीमुळे बचाव पथकांना घटनास्थळी पोहचण्यात अडथळे येत आहेत. चमोलीचे संदीप तिवारी म्हणाले की, मुसळधार बर्फवृष्टीमुळे तिथे हेलिकॉप्टर सेवा वापरता येत नाही. संवाद साधण्यासाठी सॅटेलाइट फोन किंवा इतर उपकरणेही नाहीत.


## 'माजलाय, थोड्या दिवसांचा पाहुणा घरी जाऊन..... सावंतांना पुन्हा धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८कोल्हापूर**

इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी पुन्हा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. घरात घुसून खात्मा करण्यात येईल, अशी धमकी सावंत यांना दिली आहे. केशव वैद्य नावाच्या व्यक्तीने ही धमकी दिली आहे.

नागपूर येथील प्रशांत कोरटकर नावाच्या व्यक्तीने फोन करून चार दिवसांपूर्वी इंद्रजित सावंत यांना धमकी दिली होती. याप्रकरणावरून बराच गदारोळ झाला आहे. कोरटकर सध्या फरार आहे. यातच इंद्रजित सावंत यांना पुन्हा धमकी दिल्यानं त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

शुक्रवारी ( २८ फेब्रुवारी ) केशव वैद्य नावाच्या व्यक्तीने यूट्यूब कमेंटच्या माध्यमातून सावंत यांना धमकावले आहे. 'सावंत माजलाय, थोड्या दिवसांचा पाहुणा, घरी जाऊन खात्मा करू,' अशी धमकी वैद्यने सावंत यांना दिली आहे.या धमकीमुळे कोल्हापूरसर परिसरात



खळबळ उडाली आहे. सावंत यांनी वकिलांची भेट घेतली आहे. वकिलांशी चर्चा करून पोलीस ठाण्यात तक्रार देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे सांगण्यात आले.

**कोरटकर मध्यप्रदेशात?**

इंद्रजित सावंत यांना फोनवरून शिवीगाळ करीत धमकी दिल्याप्रकरणी आरोपी प्रशांत कोरटकरच्या अटकेसाठी कोल्हापूर पोलिसांचे पथक नागपुरात पोहोचले आणि त्याच्या निवासस्थानी छापा टाकला. पण, कोरटकर हा अगोदरच फरार झाला होता. कोरटकर हा मध्य प्रदेशातील बालाघाट परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून, एक पथक तिकडे रवाना झाले आहे.

## केवळ कायदे करून अशा घटना थांबणार नाहीत : धनंजय चंद्रचूड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८पुणे**

महिलांसाठी केवळ कायदे करून काही होणार नाही तर अशा घटना रोखण्यासाठी त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यावर माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी भर दिला आहे. दिल्लीत झालेल्या निर्भया प्रकरणानंतर कायद्यात अनेक बदल करण्यात आले. मात्र, केवळ कायदे करणे पुरेसे नाही. पुण्यातीलच एका कार्यक्रमात ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. पुण्यातील स्वारगेट बलात्कार प्रकरणावर प्रतिक्रिया देताना माजी सरन्यायाधीश धनंजय



चंद्रचूड यांनी २०१२ मध्ये दिल्लीत घडलेल्या निर्भया हत्याकांडाची आठवण काढली. ते म्हणाले की, महिलां विरोधातील गुन्हे केवळ कायदे करून थांबवता येणार नाहीत तर त्या कायद्यांचे काटेकोर पालन देखील गरजेचे असल्याचे ते म्हणाले. पुण्यातील एका कार्यक्रमात त्यांना स्वारगेट बलात्कार प्रकरणी प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा ते बोलत होते.

याच प्रकरणाची आठवण काढत चंद्रचूड म्हणाले की, केवळ कायद्यांची व्यवस्था करून काहीही होणार नाही. तर समाज म्हणून समाजाची देखील मोठी जबाबदारी आहे. याशिवाय महिलांसाठी करण्यात आलेल्या कायद्यांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. ज्यामुळे महिलांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण होईल. आज मोठ्या प्रमाणात महिला नोकरी, अभ्यास आणि अन्य कामांसाठी घराबाहेर पडतात. त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे, ही आपली जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले.

कोणत्याही गुन्ह्याचा योग्य तपास, योग्य चौकशी, कठोर कारवाई, तात्काळ सुनावणी आणि कठोर शिक्षा देण्यात आली पाहिजे. त्यामुळेच अशा प्रकरणात कायदा व्यवस्था आणि पोलिसांची भूमिका महत्त्वाची आहे. या प्रकरणांची मोठ्या गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ज्यामुळे महिला सुरक्षित वातावरणात काम करू शकतील. समानतेवर आधारित समाजाचा हाच पाया असल्याचेही ते म्हणाले.

## मी तरुणीवर अत्याचार केला नाही, आमचे संबंध सहमतीने

### दत्ता गाडेचा पोलिसांसमोर धक्कादायक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८पुणे**

पुण्यात स्वारगेट बसस्थानकावर तरूणीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला पोलिसांनी आज मध्यरात्री अटक केलीय. त्याला दुपारी न्यायालयात हजर देखील केलं जाणार आहे. त्याअगोदर मात्र दत्ता गाडेने पोलिसांसमोर एक धक्कादायक दावा केलाय. त्यामुळे प्रकरणाला नवा ट्विस्ट मिळाल्याचं समोर येतंय. दत्ता गाडेच्या या दाव्यामुळे सगळीकडे मोठी खळबळ




उडाली आहे.

याला लष्कर पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवण्यात आलंय. तिथं आरोपीची कसून चौकशी केली जातेय. तर पोलीस कोठडीतच दत्ता गाडे याने टाहो फोडल्याची माहिती मिळते. माझं चुकलंय. मी पापी आहे, असं म्हणत दत्ता गाडे रडत असल्याचं समोर आलंय. मी तरूणीवर अत्याचार केलेला नाहीये. आमचे संबंध सहमतीने झाले, असा दावा देखील दत्ता गाडेने पोलिसांसमोर केलाय, असं सांगण्यात येत आहे.स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपीने तरूणीवर बलात्कार केला नाही, तर संबंध संमतीने झाल्याची कबुली दिलीय. यामुळे आता या प्रकरणात नवीन ट्विस्ट येण्याची दाट शक्यता आहे. पीडीत तरूणी आणि आरोपी हे पूर्वीपासूनच एकमेकांना ओळखत होते का? हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. जर दत्ता गाडे खरं बोलत असेल तर पिडीत तरूणी आरोपीवर असे खोटे आरोप का करत आहे, हा देखील प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतोय.

स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला पोलिसांनी मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास बेड्या ठोकल्या आहेत. मागील दोन दिवसांपासून पोलीस त्याच्या मागावर होते. परंतु, दत्ता गाडेचा मोबाईल बंद असल्यामुळे शोध मोहिमेमध्ये अडथळा येत होता. अखेर दत्तात्रय गाडेला शिरूर तालुक्यातील गुनाट या गावातून अटक केल्याचं समोर आलंय. त्याला शोधण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्याचा देखील वापर केला गेलाय.

## वाहनांच्या हायसेक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेटसाठीचे शुल्क नाही तर जिझिया कर




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

भारतीय जनता पक्षाचे सरकार जनतेची लूट करण्याची एकही संधी सोडत नाही. जनता आधीच महागाईने त्रस्त असताना आता वाहनधारकांच्या खिशावर सरकारची नजर पडली आहे. वाहनांच्या हायसेक्युरिटी नंबर प्लेटच्या नावाखाली भरमसाठ शुल्क आकारले जात आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील दर दुपटीपेक्षा जास्त असून हे शुल्क नाही तर 'जिझिया' करच आहे. असा आरोप करून हे शुल्क कमी करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांसाठी हायसेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बंधनकारक करण्यात आली आहे. या उपक्रमाचा हेतू चांगला वाटत असला तरी या आडून राज्यातील वाहनधारकांची अक्षरशः लूट सुरु आहे. महाराष्ट्र सरकारने या नंबरप्लेटसाठी आकारलेले शुल्क हे इतर राज्यातील शुल्काच्या तुलनेत दुप्पट, तिप्पट आहे.

शेजारच्या गोवा राज्यात दुचाकीसाठी १५५ रुपये आकारले जातात तर महाराष्ट्रात हाच दर ४५० रुपये आहे. तीनचाकी वाहनांसाठी गोव्यात १५५ रुपये तर महाराष्ट्रात ५०० रुपये तर चारचाकी वाहनांसाठी गोव्यात २०३ रुपये आणि महाराष्ट्रात ७४५ रुपये आकारले जातात. आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, पंजाब राज्यातही महाराष्ट्रापेक्षा कमी दर आकारले जातात. मग महाराष्ट्रातच हे दर दुप्पट वा तिप्पट आकारण्याचे कारण काय? या नंबरप्लेटसाठी १८ टक्के जीएसटी द्यावा लागणार आहे पण ही बाब आरटीओंनी लपवली आहे, हा भुर्दंडही वाहनधारकाच्या माथीच लादलेला आहे.

## ज्याला हिंदू जीवन पद्धती प्रिय आहे, असे सगळे लोक महाकुंभमेळ्यात गेले - मुख्यमंत्री फडणवीस

### काही लोक नाही गेले त्याची वेगळी कारणे असू शकतात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ मुंबई**

जगातील सर्वांत मोठ्या स्वरुपाचा धार्मिक सोहळा असलेल्या प्रयागराज येथील महाकुंभमेळ्याचा महाशिवरात्रीच्या दिवशी समारोप झाला. या दिवशी सुमारे १.४४ कोटी लोकांनी पवित्र स्नान केले. तर १३ जानेवारी २०२५ पासून ४५ दिवस सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात ६६.२१ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले. हर हर महादेवच्या जयघोषाने महाकुंभमेळ्याचा परिसर निनादला होता. या महाकुंभमेळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून विविध पक्षांचे राजकीय नेते, दिग्गज मंडळी, सेलिब्रिटींनी आवर्जून सहभागी होत गंगास्नान केले. या महाकुंभाने अनेक जागतिक विक्रमांना गवसणी घातली असून, याची दखल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्येही घेण्यात आली. परंतु, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे महाकुंभमेळ्यात गेले नाहीत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचक शब्दांत प्रतिक्रिया दिली.

महाकुंभमेळ्यात विरोधकांनीही सहभाग घेतला. अगदी रोहित पवारांपासून अनेक नेते प्रयागराजला जाऊन गंगास्नान करून आले. परंतु, उद्धव ठाकरे महाकुंभमेळ्यात गेले नाहीत, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया



विचारण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्याचा सनातन धर्मावर विश्वास आहे, ज्याला हिंदू जीवन पद्धती प्रिय आहे, असे सगळे लोक महाकुंभमेळ्यात गेले. काही लोक नाही, गेले त्याची वेगळी कारणे असू शकतात. कुणी गेले नाही म्हणजे त्यांचे सनातन धर्मावर प्रेम नाही, असे मी म्हणणार नाही. त्यांची आपली काही कारणे असतील. जे गेले त्यांचे प्रेम आहे, असे समजूया. केवळ दाखवण्यासाठी गेले नाही, असेही आपण समजूया, अशी संयमित प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**आत्मपरीक्षण करा आणि आधी आरसा पाहिला पाहिजे**

उद्धव ठाकरे अशा गोष्टी बोलत असतात. उद्धव ठाकरे काय बोलतात, त्याला रोज उत्तरे द्यायला माझ्याकडे तेवढा वेळ नाही. उद्धव ठाकरे यांनी पहिल्यांदा आत्मपरीक्षण केले पाहिजे. समजा तेच खरे होते आणि हे जर गद्दार होते, तर महाराष्ट्रातील जनतेने गद्दारांना मतदान केले का? हा महाराष्ट्रातील जनतेचा अपमान आहे. महाराष्ट्रातील जनतेने ज्यांना निवडून दिले आणि शिवसेना म्हणून ज्यांच्यावर शिक्कामोर्तब केले, त्याला तुम्ही गद्दार म्हणत आहात. तुम्ही आधी आरसा पाहिला पाहिजे, असे माझे मत आहे, असे प्रत्युत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## संपादकीय ......

# किती घाण साफ करणार?

सध्या समाजमाध्यमांवर दोनच विषयांवर जोरदार चर्चा सुरू आहे. एक म्हणजे लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित आणि विकी कौशल अभिनित 'छावा' चित्रपट आणि दुसरी यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया यांची. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' चित्रपटामुळे प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावते, तर रणवीर अलाहाबादियाच्या वाचळतेने सर्वांचीच मान शरमेने खाली जाते. एकावर स्तुतिसुमने उधळली जात आहेत, तर दुसर्‍याबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

रणवीर अलाहाबादियाने इंडियाज गॉट लेटंट या कार्यक्रमात आईवडिलांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्याचे तीव्र पडसाद देशभरात उमटले. रणवीर अलाहाबादियाबद्दल संताप व्यक्त होत आहे. त्यातूनच महाराष्ट्र, आसाममध्ये रणवीरविरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे अटक टाळण्यासाठी रणवीरने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने मंगळवारी त्याला अटकेपासून दिलासा दिला असला तरी एकूणच त्याच्या वक्तव्याबाबत नाराजीच व्यक्त केली आहे.

रणवीरची भाषा अपमानास्पद आणि आक्षेपार्ह आहे. कलेच्या नावाखाली काहीही बोलण्याची मोकळीक मिळाली आहे का? अशी विचारणा करतानाच अशा व्यक्तीचे प्रकरण आम्ही ऐकायचेच कशासाठी? प्रसिद्ध आहे म्हणून काहीही बोलू शकतो असे होत नाही. आईवडिलांचा अपमान करणार्‍याच्या डोक्यातच घाण आहे. रणवीरच्या विधानामुळे पालकच नव्हे तर बहिणींनासुद्धा लाज वाटली. ही विकृत मानसिकता आहे, असा संताप सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केला आहे.रणवीरने ज्या प्रकारे इंडियाज गॉट लेटंट कार्यक्रमात आत्मप्रौढीने एका प्रश्नाला उत्तर देत वाद निर्माण केला, तसला प्रकार आजकाल आपल्या आजूबाजूला सर्रास नजरेस येत आहे. याचा अर्थ असा नाही की रणवीरच्या वक्तव्याचे समर्थन केले जात आहे. ते शंभर टक्के चुकीचेच आहे, पण त्याचबरोबर आजूबाजूला जे घडत आहे, तेही चुकीचेच आहे. सध्या ओटीटी प्लॅटफॉर्मवरील बहुतांश वेब सीरिजमधील भाषा तशीच आहे. बेधडक शिवराळ भाषेचा वापर केला जातो. दोन वर्षांपूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाच्या एका महिला न्यायमूर्तींनीच त्याबद्दलची नाराजी भर न्यायालयात व्यक्त केली होती.एका वेब सीरिजबद्दलची सुनावणी सुरू असताना न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी आपल्याला ईअरफोन लावून तो एपिसोड पाहावा लागला. कारण त्यात ज्या प्रकारची भाषा वापरली आहे, ती सार्वजनिकपणे ऐकली असती तर लोकांना धक्काच बसला असता, अशी टिप्पणी केली. कोणीही अशी भाषा खुलेआम वापरत नाही किंवा आपल्या कुटुंबातही अशा भाषेचा वापर केला जात नाही.

या देशातील तरुण किंवा नागरिक संवादासाठी वापरत असलेली भाषा ही नक्कीच नाही, असे न्यायमूर्ती शर्मा यांनी नमूद केले होते. राजकारण्यांच्या बाबतीत तर काही बोलायलाच नको. जिथे नीतिमत्तेलाच तिलांजली दिली आहे, त्यांच्याकडून काय अपेक्षा करू शकतो? अशा भाषेसाठी शिवसेना तर आधीच प्रसिद्ध आहे. त्यातच भाजप असो, काँग्रेस असो वा अन्य कोणीही असो, जीभ स्वैर सुटलेलीच असते.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत हे प्रसारमाध्यमांसमोर खुलेआम शिवीगाळ करताना दिसतात. एवढेच नव्हे तर त्यांची कथित ऑडिओ क्लिपदेखील व्हायरल झाली होती. १७ सेकंदांच्या या क्लिपमध्ये त्यांनी २७ वेळा एका महिलेला शिव्या दिल्याचे समोर आले होते. याशिवाय शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार तसेच संजय गायकवाड यांचीही अशीच प्रकरणे समोर आली होती. ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी विरोधी पक्षनेते असल्याचे भान न राखता थेट सभागृहातच शिवीगाळ केली होती. माझ्यावर दंगलीच्या ७५ केसेस आहेत आणि चार-चार वेळेस तडीपार झाल्याची वर शेखीही त्यांनी मिरवली होती. दीड वर्षांपूर्वी भाजपचे तत्कालीन खासदार रमेश बिधुरी यांनीही लोकसभेत विरोधी पक्षाच्या एका खासदाराला शिवीगाळ केली होती. विशेष म्हणजे एवढे सर्व घडूनही त्यांना नोटीस पाठवण्याव्यतिरिक्त पक्षाकडून कोणतीही कारवाई झाली नाही.

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रणदीप सुरजेवाला यांनी भाजप खासदार हेमा मालिनी यांच्याबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरली होती.

एकीकडे मातृशक्ती, स्त्रीशक्तीचा उदोउदो करीत विविध योजना जाहीर करायच्या आणि दुसरीकडे त्यांचाच अवमान करायचा असला प्रकार निंदनीयच आहे. आजकाल जो-तो सवंग प्रसिद्धीच्या मागे आहे. बेधडक कोणतेही वक्तव्य केले तर प्रसिद्धी मिळते एवढेच त्यांना माहीत असते. हा उथळपणा फार काळ टिकत नाही हे ध्यानी घेतले पाहिजे.

विशेष म्हणजे उत्तर प्रदेशात सध्या महाकुंभमेळा भरला आहे. कोट्यवधींच्या संख्येने भाविक तिथे पवित्र स्नानासाठी जात आहेत. अशातच त्रिवेणी संगमावर पाणी प्रदूषित असल्याचा अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिला आहे. महाकुंभमध्ये मोठ्या संख्येने लोक स्नान करीत आहेत. शिवाय सांडपाणी मोठ्या प्रमाणात नदीमध्ये येत असल्याने पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत असल्याचे मंडळाने म्हटले आहे. एकूणच मानवी मेंदूत विचारांची, तर गंगा नदीत प्रदूषणाची घाण आहे. ही घाण कोण आणि कशी साफ करणार, हाच एक जटिल प्रश्न आहे.

# आता घरबसल्या तुमच्या मोबाईलवरच करता येणार रेशनसाठी ई-केवायसी; कशी?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती-** शासनाने शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. स्वस्त धान्य दुकानातून ई-पॉस मशीनद्वारे मोफत केवायसी केले जात आहे, परंतु लहान मुले आणि वृद्ध लोकांना बोटांचे ठसे आणि डोळ्यांद्वारे स्कॅन करताना अडचणी येत आहेत.

या पार्श्वभूमीवर शासनाने मेरा ई-केवायसी अ‍ॅप कार्यरत केले आहे. आता लाभार्थी स्वस्त धान्य दुकानात न जाता काही मिनिटांत स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबाचे केवायसी पूर्ण करता येणार आहे.

अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी घरबसल्या काही मिनिटांतच आपली ई-केवायसी पूर्ण करू शकतात. राज्य सरकारने छखउ च्या सहकार्याने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी Mera E-KYC हे प सुरू केले आहे. यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रास्त भाव दुकानावर न जाता घरबसल्या ई-केवायसी पूर्ण करता येईल.

**मुख्य वैशिष्ट्ये**

१) घरबसल्या सोप्या पद्धतीने ई-केवायसी करा.

२) फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानाद्वारे झटपट पडताळणी.

३) रास्त भाव दुकानदार किंवा इतर कोणताही सदस्य ई-केवायसी करू शकतो.

४) आधार क्रमांक मोबाईलशी लिंक असणे आवश्यक.

ई-केवायसी कशी करावी? (Step-by-Step मार्गदर्शन)

१) प्ले स्टोअरवरून खालील दोन प




डाउनलोड करा.

अ) चशीर E-KYC Mobile -pp खालील लिंकवरून डाउनलोड करा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.nic.facialauth

~) -adhaar Face RD Service -pp खालील लिंकवरून डाउनलोड करा.

https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.uidai.facerd

२) प इन्स्टॉल करून सेटअप करा.

दोन्ही प इन्स्टॉल करा आणि आवश्यक परवानग्या द्या.

३) Mera E-KYC n उघडा आणि पुढील स्टेप्स फॉलो करा.

- राज्य : महाराष्ट्र निवडा.

- आधार क्रमांक : टाका आणि आधारशी संलग्न मोबाईलवर आलेला जढझ प्रविष्ट करा. - कॅप्चर : दिलेल्या कोडची नोंद करा.

४) चेहर्‍याद्वारे पडताळणी करा

- स्वतःसाठी समोरचा कॅमेरा सुरू करून चेहरा स्कॅन करा.

- स्क्रीनवर दिलेल्या सूचनांनुसार डोळ्यांची उघडझाप करा.

- दुसर्‍या व्यक्तीची केवायसी करत असल्यास बॅक कॅमेरा वापरा.

५) सत्यापन पूर्ण

- यशस्वी पडताळणी झाल्यास लाभार्थ्याची माहिती रास्त भाव दुकानाच्या ई-पॉस मशीनवर दिसेल.

- याची खात्री करण्यासाठी पमध्ये ए-घधउ डींर्ीीी तपासा.

- जर E-KYC Status - Y दिसत असेल, तर प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**अत्यंत महत्त्वाचे**

- ही सेवा फक्त महाराष्ट्रातील लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

- महाराष्ट्राबाहेर स्थलांतरित लाभार्थ्यांसाठी खचझउद्ध घधउ पर्यायाचा उपयोग करावा. शेवटची तारीख : ३१ मार्च २०२५ (परंतु २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण करावी).रास्त भाव दुकानदारांनी देखील शिधापत्रिका धारकांना सहकार्य करून सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी लवकरात लवकर पूर्ण करावी, जेणेकरून कोणत्याही लाभार्थ्यांना अन्नधान्यापासून वंचित राहावे लागू नये.

# उन्हाळी हंगामात फायद्याचे तेलबिया पिक 'सूर्यफूल'; कशी कराल लागवड?

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक**

विविध प्रकारच्या गळीत धान्य पिकांमध्ये 'सूर्यफुल' लागवड रब्बी तसेच उन्हाळी हंगामातही फायदेशीर ठरत आहे

**विविध जाती** - सूर्यफुल लागवडीतून अधिक उत्पादनासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने सुधारीत जातींची शिफारस केली आहे.

- त्यामध्ये मॉडर्न, एस. एस. ५६, ई. सी. ६९८७४, ई. सी ६८४१३, ई. सी. ६८४१४, ई. सी ६८४१५, बी. एस. एच, सूर्या, एम. एस. एफ. एच. १ या ८५ ते १२० दिवसांत तयार होणाऱ्या व हेक्टरी १० ते १५ क्विंटल उत्पादन देणाऱ्या सुधारीत जातींचा समावेश आहे.

**पूर्वमशागत**- जमीन उभी-आडवी खोल नांगरून २-३ कुळवाच्या पाळ्या देऊन भुसभुशीत करावी.- शेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत जमिनीवर पसरवून मातीत मिसळून द्यावे.- जमीन समपातळीत आणावी. शुध्द, प्रमाणित, वजनदार व निरोगी बियाणे लागवडीसाठी निवडावे.- पीक काढणीनंतर तयार झालेले बियाणे लगेच पेरणीसाठी वापरू नये.- हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे.- पेरणीपूर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवून नंतर सावलीत वाळवावे.- बियाण्याला प्रतिकिलोस २५ ग्रॅम प्रमाणात ट्रायकोडर्मा हर्जिनम या जैवनियंत्रणाची बीज प्रक्रिया करावी.

**पेरणी कशी करावी?**- पिकाची पेरणी रब्बी हंगामात ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात, तर उन्हाळी हंगामात फेब्रुवारीपर्यंत करावी.- भारी जमिनीत पेरणी करताना दोन ओळीत ६० सेंटीमीटर अंतर ठेवावे.- दोन झाडातील अंतर ३० सेंटीमीटर ठेवावे. एका ठिकाणी दोन दाणे पेरावेत.

**आंतरमशागत**- पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी विरळणी करून प्रत्येक ठिकाणी जोमदार रोप ठेवावे.- पेरणीनंतर २० दिवसांनी कोळपणी करावी, तर ३० ते ४० दिवसांनी खुरपणी करावी.- पिकाला हलकीशी मातीची भर द्यावी.- सूर्यफुलाची चांगली बीजधारणा होण्यासाठी मशागत गरजेची आहे.

**पाणी व्यवस्थापन**- उन्हाळी हंगामात पिकाला दहा ते बारा दिवसांच्या अंतराने आठ ते नऊ वेळा पाणी द्यावे.

**विशेष काळजी**

सूर्यफुलाची बीजधारणा चांगली होण्यासाठी फुले उमलण्याच्या काळात ४ ते ६ दिवस रोज सकाळी हातावर मलमल/तलम सुती कापड बांधून फुलावर हळूवारपणे हात फिरवावा किंवा शेतात मधमाशांच्या पेट्या ठेवाव्यात म्हणजे फुलातील बिया पूर्ण भरण्यास मदत होते.

**काढणी व्यवस्थापन**

पीक तयार होताना फुलाजवळील पाने पिवळी पडतात, दाणे टणक होतात. फुले काढून उन्हात वाळवावी, दाणे वेगळे करावे व वाफणी करून वाळवून ठेवावेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष










# उन्हाळी पिक म्हणून तीळाला पसंती !

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८धामणगाव रेल्वे-** धामणगाव रेल्वे तालुका परिसुरामध्ये यावर्षी उन्हाळी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी तीळे या पिकाला पसंती दिलेली आहे.

उन्हाळी तीळ पिकांची जवळजवळ १००० एकर जमिनीवरती लागवड पूर्ण झालेली आहे. धामणगाव रेल्वे परिसरामध्ये आणि गावातील बहुतेक शेतकऱ्यांचे हरभरा ही पीक काढणीच्या अवस्थेमध्ये असून अनेक शेतकऱ्यांचे हरभरा पिक काढून झालेले आहे. जमिनीमध्ये होणारी लागवड करण्याकरिता शेतकयांनी तीळह्या पिकाला प्रथम पसंती दिली आहे. बहुतेक शेतात तिळाची लागवड पूर्ण झालेली आहे. यामध्ये प्रामुख्याने जुना धामणगाव, कावली, वसाड , वाघोली, दाभाडा, मंगरूळ, शिदोरी या गावातील प्रमाण जास्त आहे. तिळा साठी असे हवे जमीन व हवामान तीळ ह्या पिकासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन हवी. हे पीक साधारणता ८५ ते ९० दिवसाचे असून त्यापासून हेक्टरी ६ ते ८ क्टिल पर्यंत उत्पादन अपेक्षित असते.




# एकाग्रता वाढवणाऱ्या ब्रीदिंग एक्सरसाइज

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या वेगवान जगात, एकाग्रता राखणे हे एक मोठे आव्हान बनले आहे. अभ्यास असो, काम असो किंवा कोणतीही क्रिएटिव्ह काम असो, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता आपली कामगिरी सुधारण्यास मदत करते.



अशा परिस्थितीत, ब्रीदिंग एक्सरसाइज करणे हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. या तंत्रामुळे केवळ ताण कमी होत नाही तर मन शांत करून एकाग्रता वाढविण्यास मदत होते. आजच्या या लेखात जाणून घेऊयात अशा काही प्रभावी एक्सरसाइजबद्दल.

खोल श्वास घेणे

खोल श्वास घेणे ही सर्वात सोपी आणि प्रभावी तंत्रांपैकी एक पद्धत आहे. हे करण्यासाठी, प्रथम आरामदायी स्थितीत बसा. डोळे बंद करा आणि हळूहळू श्वास घ्या. तुमच्या पोटात श्वास भरण्याचा प्रयत्न करा, जेणेकरून तुमचे पोट फुगेल. नंतर, तोंडाद्वारे हळूहळू श्वास सोडा. ही प्रक्रिया ५ ते १० वेळा पुन्हा करा. या तंत्रामुळे मेंदूला ऑक्सिजनचा प्रवाह वाढतो, ज्यामुळे लक्ष केंद्रित होते आणि मानसिक संतुलन योग्य राखण्यास मदत होते.

नाडी शोधन प्राणायाम

नाडी शोधन प्राणायाम ही एक प्राचीन योग पद्धत आहे जी मन शांत करण्यासाठी आणि एकाग्रता वाढवण्यासाठी मदत करते. हे करण्यासाठी, प्रथम आरामात बसा आणि तुमच्या उजव्या हाताच्या अंगठ्याने तुमची उजवी नाकपुडी बंद करा. डाव्या नाकपुडीतून श्वास घ्या आणि नंतर उजव्या नाकपुडीतून बोटाने डावी नाकपुडी बंद करून श्वास सोडा. यानंतर, उजव्या नाकपुडीने श्वास घ्या आणि डाव्या नाकपुडीने श्वास सोडा. ही प्रक्रिया ५ ते १० मिनिटे पुन्हा करा. हे तंत्र मेंदूच्या दोन्ही भागांना संतुलित करते, ज्यामुळे लक्ष केंद्रित होते .

४-७-८ ब्रीदिंग टेक्निक

४-७-८ श्वास घेण्याची पद्धत ताण कमी करण्यासाठी आणि मन शांत करण्यासाठी खूप प्रभावी आहे. हे करण्यासाठी, प्रथम आरामात बसा आणि जिभेचे टोक वरच्या दातांच्या मागे ठेवा. आता नाकातून श्वास घ्या आणि मनात ४ पर्यंत आकडे मोजा. मग श्वास रोखून ७ पर्यंत मोजा. यानंतर, तोंडाने श्वास सोडा आणि ८ पर्यंत मोजा. ही प्रक्रिया ४ ते ५ वेळा पुन्हा करा. हे तंत्र मन शांत करून एकाग्रता वाढवण्यास मदत करते .

भ्रामरी प्राणायाम

भ्रामरी प्राणायाम ही एक अशी पद्धत आहे जी मनाला शांत करण्यास आणि एकाग्रता वाढवण्यास मदत करते. हे करण्यासाठी, आरामात बसा आणि डोळे बंद करा. आता तुमच्या दोन्ही हातांची बोटे तुमच्या डोळ्यांवर ठेवा आणि अंगठ्याने कान बंद करा. त्यानंतर, ओम उच्चारत नाकातून दीर्घ श्वास घ्या आणि तोंडातून श्वास सोडा. ही प्रक्रिया ५ ते ७ वेळा पुन्हा करा. हे तंत्र मेंदूच्या नसा शांत करते आणि आपले लक्ष केंद्रित करते.


# अध्यापनात कसूर करणे शिक्षकांना भोवणार

## सिईओ संजिता महापात्र यांचा कठोर पवित्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती -** अध्यापनात कसूर करणे अथवा कर्तव्यावर असताना गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांवर आता शिक्षण विभागाच्या पथकाची नजर राहणार आहे. याकरिता आकस्मिक पथकाचे गठण करण्याच्या सूचना सीईओ संजिता महापात्र यांनी गुरुवारी काढलेल्या परिपत्रकातून शिक्षण विभागाला दिल्या आहेत. या पथकाला थेट कारवाईचे अधिकार राहणार आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील घटती पट संख्या, शैक्षणिक गुणवत्ता कायम ठेवण्यात होत असलेले दूर्लक्ष आणि नुकताच प्राप्त झालेला 'असर' चा अहवालावरुन जिल्हा अ परिषद प्राथमिक शाळांमध्ये अधिक गुणवत्तापूर्वक काम होणे अपेक्षित असल्याचे सीईओंनी म्हटले आहे. बऱ्याच ठिकाणी विशेषतः दुर्गम भागातील शाळेवर शिक्षक गैरहजर राहत असल्याची बाब लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिली आहे.जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये आकस्मिक भेट देण्याचा नियमितपणे आराखडता तयार करण्याच्या सूचना पर्यवेक्षिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.



### आकस्मिक पथक करणार थेट कारवाईची शिफारस

गठीत करण्यात आलेल्या आकस्मिक पथकाव्दारे शाळांना आकस्मिक भेट देणे बंधनकारक आहे. भेटी दरम्यान शाळेवर उशिरा येणारे, लवकर निघून जाणारे किवा विनापरवानगी गैरहजर शिक्षकांवर महाराष्ट्र परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा भंग केल्याचे कारणास्तव जिप जिल्हा सेवा (शिस्त व अपिल)नियम १९६४ नुसार थेट शास्तीची शिफारस करावी, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी आपले कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये नियमितपणे भेट देवून वर्ग विद्यार्थीशी संवाद साधणे, संबंधित वर्ग शिक्षक अथवा विषय शिक्षक यांचेकडून शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी अध्यापन, कृक्तिशील उपक्रम, खेळ, चाचणी, आदी होत आहे, याबाबतची खात्री करावी. सदर कामात कुचराई झाल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित गट शिक्षणाधिकारी यांनी कारवाईच्या शिफारसह सादर करावा.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण

# महाशिवरात्रीच्या एकाच दिवशी लालपरीला ६ लाख २९ हजार रुपयांचे उत्पन्न

## १२ हजार शिवभक्तांचा सालबर्डीकरीता एस टी ने प्रवास





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील सिमेवर यात्रा महोत्सव असलेल्या सालबर्डीला दोन्ही राज्यातून लाखोंच्या संख्येने शिवभक्त महाशिवरात्रीला जातात. महाराष्ट्रातील शिवभक्तांकरिता विविध आगारातून अतिरिक्त बसेस सोडण्यात आल्या होत्या. बुधवारी महाशिवरात्रीच्या पर्वावर दिवसभरात ११ हजार ९९७ भक्तांनी सालबर्डीकरिता बसमधुन प्रवास केला. एकाच दिवसात एसटी महामंडळाने ६ लाख २९ हजार ८३० रुपयांची कमाई केली आहे. विविध आगारातून सालबर्डीकरिता २८८ फेऱ्या बुधवारी सोडण्यात आल्या होत्या.

मध्यप्रदेशात असलेल्या सालबर्डीला जाण्याकरिता जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातून पहाडाची चढाई सुरू करावी लागते. महाराष्ट्रात यात्रा महोत्सव तर मध्यप्रदेशात भुयारात जागृत शिवलिंग आहे. त्यामुळे दोन्ही राज्यातुन लाखोंच्या संख्येने भाविक भक्त येथे महाशिवरात्रीच्या आदल्या दिवसांपासून तर पुढे सात दिवस गर्दीकरतात. येथील शिवभक्तांच्या सुविधेकरिता एसटी महामंडळाने २३ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान ९५० अधिक बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. यात मंगळवार ते गुरूवार या तीन दिवस येथे मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने तीन दिवसांत फेऱ्या वाढविण्यात आल्या आहेत. अशातच बुधवारी महाशिवरात्रीला सर्वाधिक २८८ बसेस सोडण्यात आल्या होत्या.यामधुन ११ हजार ९९७ शिवभक्तांनी शिवशंभू महादेवाचे दर्शन घेतले. एकाच दिवसात एसटी महामंडळाने ६ लाख २९ हजार ८३० रुपयांची कमाई केली आहे. २ मार्चपर्यंतसदर बसेस विविध आगारातून जाणार आहेत. प्रवासादरम्यान – ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास तसेच महीला व जेष्ठनागरीकांना प्रवासात ५० टक्के सवलत देखील देण्यात आली आहे.

# पलसकुंडी गावात वाघिणीने केली गायीच्या वासराची शिकार

## आदिवासींमध्ये दहशत, गावात स्मशान शांतता



***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.२८धारणी*** *–अकोट वन्यजीव विभागातंर्गत असलेल्या धारणी तालुक्यातील सर्वा जास्त दुर्गम स्थानावरील जंगलात वसलेल्या पळसकुंडी गावात मंगळवारच्या पहाटे वाघिण आपल्या शावकासोबत फेरफटका मारताना दिसल्याने संपूर्ण गावात दहशत पसरली आहे.*

*घरासमोरील गोठ्यात गायीच्या वासराची शिकार वाघिणीने केली. मात्र, शिकारीचा पाय लाकडात अडकल्याने वाघिणीला शिकार सोडून जंगलात परतावे लागले, सुर्यास्तानंतर झालेला हा संपूर्ण घटनाक्रम आदिवासींनी पाहिल्यानंतर त्यांनी स्वतःला घरात कैद करून घेतले.धारणी पासून ६० किमी अंतरावरील पळसकुंडी गाव हे तीन जिल्ह्याच्या डोंगराच्या पायथ्याशी वसलेले गावत आहे.*

*अकोट वन्यजीव विभागाच्याधुळघाट रेल्वे वनपरिक्षेत्रातील पळसकुं डी गाव अगदी कुंडी सारख्या आकाराने वसलेले आहे. २५ फेब्रुवारीच्या पहाटे गावात वाघिण आपल्या शावकारसोबत चक्कर मारून गेलेली होती. यावेळी वाघिणीने राजेश मनोहर इंगळे यांच्या घरासमोरील गोठयात गायीच्या वासराची शिकार केली.*

*माहितीप्रमाणे, वासराला दोन दात होते. शिकार झाल्यावर वाघिणीने मृत वासरला ओढून नेण्याचा प्रयत्न केल्याचे प्रथमदर्शनी समजते.*

*वासराचा पाय लाकडी फाट्यात अडकल्याने वाघिणीला शिकार सोडून जावे लागले. कारण इतर गुरांची आरडाओरड सुरू केलेली होती. म्हणून वाघिणीने मोक्यावरून पळ काढला.*

*धुळघाटरेल्वे वनपरिक्षेत्र यांना याविषयी माहिती देण्यात आली. मात्र, वाघिणीच्या बंदोबस्तासाठी उपाय योजना करण्यात आलेल्या नाही.*

*पळसकुंडी गाव व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये आहे. सडक नाही तर वीज सतत खंडीत होत असते. म्हणून आदिवासी पार घाबरलेले आहेत. अस्वल आणि वाघ नेहमी गावालगतच्या शेतात फिरत असतात. आता तर चक्क गावात वाघिण आल्याने ग्रामस्थांच्या जिवाचा थरकाप उडालेला आहे.*

# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या बंगल्यातील चंदनाचे झाड चोरी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** – येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या बंगल्यातील दोन चंदनाची झाडे चोरट्यांनी कापून नेल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी शुभम विनोद गोलाईत (वय २८ ) यांच्या तक्रारीवरून अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या बंगल्यावर नियमाप्रमाणे बुधवारी रात्री एक तीनची गार्ड ड्युटीवर तैनात होती. न्यायालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी शुभम गोलाईत सुध्दा रात्री १०.४५ वाजता ड्युटीवर आला होता आणि बंगल्याच्या पोर्चमध्ये खुर्चीवर बसला.रात्री १ वाजता तो पोर्चमध्ये झोपला. रात्री २ वाजताच्या सुमारास न्यायाधीश दरवाजा उघडून पोर्चमध्ये आले आणि बंगल्याच्या मागून कशाचा तरी आवाज येत असल्याचे सांगितले. ड्युटीवर तैनात पोलीस कर्मचाऱ्यांना आवाज देऊन मागे जाऊन पाहायलासांगितले.पोलिसांनी मागे जाऊन पाहिले असता आवारातील दोन चंदनाची झाडे बुडातून कापलेली दिसली. सकाळी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

# कोटक महिन्द्रा बँकेतील रोखपालाचा प्रताप

## ५४ लाखांची रक्कम घेऊन पसार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शेगाव नाका परिसरात असलेल्या महिन्द्रा कोटक बँकेचा रोखपाल बँकेची तब्बल ५४ लाखाची रक्कम घेऊन पसार झाला असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रोखपालगत अनेक दिवसांपासून गैरहजर असल्याने बँकेतील अधिकाऱ्यांना संशय आल्याने त्यांनी कॅश तपासल्यानंतर ५४ लाखाची रक्कम गायब असल्याचे दिसले. याबाबत गाडगेनगर पोलिसांनी रोखपालाविरोधात गुन्हे दाखल केले आहे.

रूत्वीक गजानन बोंडे (२४) रा. अमरावती, एक महिला अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. महिन्द्रा कोटक बँकेचे शेगाव नाका शाखेचे प्रबंधक शैलेश रामदास कांबे (३३) रा. देशपांडे प्लॉट, नवाथे चौक, अमरावती यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. माहितीनुसार, रूत्वीक बोंडे हा महिन्द्रा बँकेच्या शेगाव नाका शाखेत रोखपाल पदावर कार्यरत असून आरोपी महिला सहाय्यक रोखपाल म्हणून रूत्वीकच्या हाताखाली काम करित होती. काऊंटवरील कॅश जमा करणे, देणे आणि डयूटीझाल्यानंतर संपूर्ण कॅश स्ट्रांगरूममध्ये जमा करणे, ही संपूर्ण जबाबदारी रूत्वीक बोंडेची होती. काऊंटरमधील ड्रॉव्हर व लॉकर तसेच स्ट्रॉगरूमच्या गेटची व आतील लॉकरची चाबी देखील रूत्वीककडे असायची. रूत्वीकने महिला आरोपीसह मिळून २० जुन २०२४ ते १० फेब्रुवारी २०२५ या काळात ते नियमित डयूटीवर येत होते. १० फेब्रुवारीपासून रूत्वीक व महिला आरोपीने अचानक बँकेत येणे बंद केल्याने आणि चाब्या देखील दोन्ही आरोपींकडेच असल्याने शाखेचे प्रबंधक शैलेश कांबे यांना शंका आल्याने त्यांनी काही दिवसांपूर्वी अन्य चाबीने स्ट्रॉगरूम उघडून कॅशची

### नियमित अंकेक्षणात धक्कादायक प्रकार उघड

तपासणी केली असता स्ट्रॉगरूमध्ये १०, २०,५०,१००, २००व५०० अशा नोटांचे बंडल होते. अधिकाऱ्यांनी वर्षभराच्या ऑडीटरिर्पोटनुसार कॅश तपासणी असता ५०० रूपयाच्या १० हजार ८०० नोटा म्हणजे एकूण ५४ लाखाच्या नोटा गायब दिसल्याने बँकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना चांगलच धक्का बसला. आता दोन्ही आरोपींनी वरील नमूद कालावधीमध्ये हळू-हळू ही कॅश गायब केली का एकाच वेळीवेळी बँकेच्या बाहेर नेली, हे अधिकाऱ्यांनाही समजले नाही. त्यानुसार शाखा प्रबंधक शैलेश कांबे यांनी याबाबत गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी रूत्वीक बोंडेसह महिला आरोपीविरोधात गुन्हे दाखल केले असून पुढील तपासासाठी बँकेचे आतील व बाहेरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी प्राप्त केले असून पोलिस फुटेजची कसून तपासणी करित आहेत.

# अमरावती विद्यापीठातील सुरक्षारक्षकांचे आर्थिक शोषण

## सुरक्षारक्षकांचा आरोप, कंपनी बदलविण्याची केली मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८अमरावती** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे साई सेक्युरिटी सर्विसेस या कंपनीच्या माध्यमातून ८० सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. त्यांना पंधरा हजार रुपये वेतन कबूल केलेले असताना कंपनीकडून केवळ ७ हजार ५०० दरमहा देऊन कंपनी तीन वर्षापासून सुरक्षारक्षक कामगारांचे आर्थिक शोषण करीत करीत असल्याचा आरोप सुरक्षारक्षक कृती समितीचे अनिल काळबांडे यांनी गुरुवारी (ता. २७) पत्र परिषदेतून केला. सुरक्षा रक्षकांचे शोषण करणाऱ्या साई सेक्युरिटी सर्विसेस या कंपनीऐवजी अन्य कंपनीला सुरक्षारक्षक पुरवठ्याचे कंत्राट देण्यात यावे. नव्या कंपनीने कामगारांना



नियमानुसार पीएफ, ईएसआय, वेतनचिठ्ठी देण्याची व्यवस्था करावी, पत्र परिषदेला अनिल काळबांडे, प्रशांत बावनकुळे, अरविंद जोंधळे, भूषण डांगे उपस्थित होते.

## स्वतःच्याच खात्यावर ओढले ताशेरे

# मंत्री नरहरी झिरवळ म्हणतात..विभागाची अवस्था दयनीय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** अन्न व औषधी विभागामध्ये मनुष्यबळ तसेच लॅबची कमतरता असल्याने पाहिजे त्या प्रमाणात कारवाई करण्यास अडचणी निर्माण होतात. ५० ते ५२ टक्के कर्मचारी विभागात आहेत. विभाग चालवायचा असेल तर कर्मचारी भरती आवश्यक आहे. त्यातही लॅबमध्ये तांत्रिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळाची गरज आहे. एकंदरीत विभागाची अवस्था दयनीय आहे. हे सांगण्याची नव्याने आवश्यकता नसल्याचे सांगत अन्न व औषधी विशेष सहायता मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अमरावती विभागीय कार्यालय येथे पत्रकारांशी चर्चा करताना आपल्याच खात्याला घरचा आहेर दिला. राज्यभरातील प्रत्येक विभागासाठी एक प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

एमपीएससीच्या माध्यमातून विभागात १९० जागा भरण्यात येतील. नागपूर, नाशिक, पुणे तसेच राज्यभरात प्रयोगशाळा सुरू करण्यात येतील. राज्यात गुटखाबंदीची कठोर अंमलबजावणी




करण्यासाठी मनुष्यबळाची गरज आहे. ही अडचण सोडविण्यासाठी कॅबिनेट पढे हा मुद्दा मांडणार आहे. राज्यभरात मोबाईल व्हॅन प्रयोगशाळेच्या माध्यमातून दूध तेल खाद्यपदार्थामध्ये होत असलेल्या भेसळची तपासणी केली जाईल. खाद्यपदार्थांचे नमुने पाठविल्यानंतर तो अहवाल १२ ते १३ दिवसात द्यावा लागतो. मात्र प्रयोगशाळा झाल्यानंतर पाच ते सहा दिवसात अहवाल मिळणारअसल्याचे झिरवाळ यांनी सांगितले.अमरावती विभागात अन्न व औषधी विभागाकडून विविध आस्थापनात १४७ तपासण्या करण्यात आल्यात. २८ प्रकरणात ४.७५ कोटीची जप्ती करण्यात आल्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.आदिवासी बहुल भागात आजही अंधश्रद्धा दिसून येते. त्यामुळे आदिवासींमध्ये अंधश्रद्धेसंदर्भात प्रबोधन करून त्याचे निर्मूलन करण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. त्याकरिता सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा, असे एका प्रश्नाच्या उत्तरादाखल नामदार नरहरी झिरवाळ म्हणाले.

# नागपूरचे जिल्हाधिकारी कार्यालय राज्यात प्रथम

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी इटनकर पुरस्कृत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ नागपूर–** राज्यात १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम हाती घेण्यात आली. या मोहिमेच्या अंतरिम प्रगतीच्या मूल्यमापणामध्ये राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमधून नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांना पुरस्कृतकरीत त्यांचे अभिनंदन केले.राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय प्रशासन हे लोकाभिमूख, गतिमान व पारदर्शक चालावे यासाठी ७ जानेवारी २०२५ ते १६ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहीमेचा अंतरिम प्रगतीचा आढावा गुरूवार २७ फेब्रुवारी रोजी घेण्यात आला. राज्यातील सर्व मंत्रालयीन विभागांचे, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, आयुक्त, संचालक,



पोलीस आयुक्त, विभागीय आयुक्त, पोलीस परिक्षेत्र, महानिरीक्षक, उपमहानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका, आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कामगिरींचे, कार्यालयांची,संकेतस्थळे, सुकर जीवनमान, स्वच्छता, तक्रार निवारण, अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी, कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञानाचा वापर (ए. आय), नाविण्यपूर्ण उपक्रम इत्यादी निकषांच्या आधारे मूल्यमापण करण्यात आले. या अंतरिम प्रगतीच्या मूल्यमापणामध्ये राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमधून नागपूरम्या जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.

# सरपंचाला मारहाण प्रकरणी १७ जणांविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती –** भातकुली तालुक्यात उपराई येथील सरपंच व त्यांच्या मित्रांवर एका समुदायातील नागरिकांनी २५ फेब्रुवारीला रात्रीच्या सुमारास केलेल्या प्राणघातक हल्ला व जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी सुजितकुमार भिमराव सुरवाडे यांच्या तक्रारीवरून खल्लार पोलिसांनी १७जणांविरुद्ध गुन्हा नोंदवून त्यापैकी एकाला अटक केली आहे.संबंधिताविरुद्ध ॲक्टनुसार ॲट्रॉसिटी ३(१) आर, ३(१) (५),३ (२) व्ही एन ए, तसेच कलम २९६, १८९ (२), १९०, १९१ (२), ११५, ३५१(२) ३५२ बी एन एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यापैकी अब्दुल जमील अब्दुल जलील यास अटक करण्यात आली आहे. तर १६ जण पसार असून त्यांचा शोध घेणे सुरु असल्याचे खल्लार पोलिसांनी सांगितले. तर दुसरीकडे एका ३७ वर्षीय महिलेने जिल्हा सामान्य रुग्णालयात दिलेल्या बयानानुसार घटनेच्या रात्री ८:३० वाजता घरामागे पाणी भरत असताना निरज नागे व सुजितकुमार सुरवाडे या दोघांनी घरात घुसून शिवीगाळ व विनयभंग केल्याचे म्हटले आहे. त्यावरून त्या दोघांविरुध्द कलम ७४,३२९(३), ११५,३ (५) बी एन एसनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास उपविभागीय अधिकारी राहुल गायकवाड व खल्लारचे ठाणेदार रविंद्र बारड करीत आहेत.



उपराई येथिल परिस्थिती नियंत्रणात असून गावात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, व्यासाठी गावातील मुख्य ठिकाणी पोलिस बंदोबस्त आहे. हल्ला प्रकरणातील पसार १६ जणांच्या शोध विण्याबाबत वरिष्ठाच्या मार्गदर्शनात वेगवेगळे पथक नेमले आहे.– **रविंद्र बारड,(पोलीस निरीक्षक)खल्लार.–**

# बौद्ध धम्म परिषद रविवारी नाशिकमध्ये

## दलाई लामा यांच्यासह मुख्यमंत्री फडणवीसांनाही निमंत्रण





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ नाशिक**

'चलो बुद्ध की और...' हा संदेश देत काळाराम मंदिर सत्याग्रह दिनानिमित्त येथील गोल्फ क्लब मैदानात रविवारी २ मार्चला राज्यस्तरीय भव्य धम्म परिषद होत आहे. जागतिक बौद्ध धम्म गुरू दलाई लामा यांच्यासह भारत, मलेशिया, जपान, नेपाळ, कंबोडिया, थायलंड आदी देशांतील धम्मगुरू, बौद्ध उपासक, अभ्यासक परिषदेला उपस्थित राहतील.४० ते ५० हजार नागरिकदेखील उपस्थित राहणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत परिषदेचे स्वागतप्रमुख प्रकाश लोंढे, भदन्त सुगत महाथेरो यांनी दिली. गोल्फ क्लब मैदानावर परिषदेची तयारी करण्यात येत असून चार स्वतंत्र व्यासपीठ असतील. परिषदेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजीत पवार, केंद्रीय केंद्रीय अल्पसंख्यांक व्यवहार मंत्री कीरण रिजिजू, सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले आदी उपस्थित राहणार आहेत. सकाळी १० ते १२ काळाराम मंदिरात सत्याग्रहींना अभिवादन, दुपारी १२.३० वा.धम्मसंस्कार विधी व चर्चासत्र तसेच दुपारी चार वाजता बौद्ध धम्म परिषद होईल.


# मजुरांना घेऊन जाणारे वाहन पलटले

## एक महिला ठार चालकासह सहा मजूर गंभीर जखमी

### सावर्डी येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नांदगाव पेठ –** ६संत्रा तोडण्यासाठी मजुरांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचे संतुलन बिघडल्याने झालेल्या अपघातात एक जण ठार तर ७ जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास महामार्गावरील सावर्डी येथे घडली.घटनेत जमुना देविदास सावंत (२५) रा.शासकीय वसाहत, नांदगावपेठ यांचा जागीच मृत्यू झाला तर अपघातातील अन्य ७ गंभीर जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. चालकाला झोपेची गुंगी आल्याने अपघात घडल्याचे सांगितले जात आहे. घटनेबाबत सविस्तर वृत्त असे की, एमएच–०६–बीडब्ल्यू–०५३४ क्रमांकांच्या या वाहनाने काही मजूर शेंदोळा येथे जात असतांना सकाळी १० वाजताच्या दरम्यान सावर्डी या गावाजवळ वाहनचालकाला झोपेची गुंगी आल्याने वाहनाचे संतुलन बिघडले आणि वाहन पलटी झाले. यामध्ये जमुना देविदास सावंत या महिलेचा जागीच मृत्यू झाला तर अनिता दिलीप तांबे व राजेश्री राजेश तोडासे (वय २८ वर्ष) जयश्री राजेश तोडासे (वय १९ वर्ष) दोन्ही रा. फुटफुले नगर अमरावती,चालक शेख अफजल शेख वसीम (वय ३० वर्ष) रा. सय्यदपुरा नांदगावपेठ व अन्य दोन मजूर गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती मिळताच घटनेच्या काही वेळातच नांदगावपेठ पोलिसांचा ताफा तात्काळ घटनास्थळी दाखल झाला. घटनास्थळावरील सर्व जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.



इर्विनमध्ये डॉक्टरांनी तपासणीनंतर जमुना सावंत यांना मृत घोषित केले. तर अन्य जखमींवर उपचार सुरू आहेत.फिर्यादी सागर तात्या सोळंवे वय २४ वर्ष व्यवसाय राजकाम रा. शासकीय वसाहत नांदगांवपेठ यांच्या तक्रारीवरून आरोपी चालकाविरुद्ध बीएनस कलम २८१, १२५(–), १२५ (इ), १०६ (२) सहकलम १८४ मोटार वाहन कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# विद्यापीठात योगाच्या माध्यमातून आनंदी जीवनाचे व्यवस्थापन विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे १ मार्च रोजी आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती –**प्रधानमंत्री उच्च स्तर शिक्षा अभियान(पीएम–उषा)अंतर्गत योग व निसर्गोपचार या विषयाला जागतिक कीर्ती प्राप्त व्हावी, याचबरोबर भावनिक व मानसिक स्वास्थ निरोगी व सुदृढ रहावे तसेच आजच्या धकाधकीच्या काळात आदर्श जीवनाचे व्यवस्थापन योगामार्फत व्हावे, हा उदात्त हेतू ठेवून आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व युजीसी – मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटर यांचे संयुक्त विद्यमाने दि. १ मार्च, २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता क्रीडा व रंजन विभाग मैदान येथे, तर ९.३० वाजता विद्यापीठ परिसरातील दृकश्राव्य सभागृह येथे एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून शरीराची लवचिकता, वक्रता, स्थिरता आणि दृढता याचबरोबरच मेंदूवर होणारा तणाव यापासून मुक्त करण्याचे तंत्र, योग व निसर्गोपचार पद्धतीवर आधारित तणाव मुक्ती तंत्राचा वापर आदींची माहिती दिली जाणार आहे. उदा, आहार, हायड्रेशन, निसर्गोपचार, भावनिक आणि मानसिक आरोग्याबद्दल गैरसमज आणि तथ्य यावर तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार असून योगाविषयी समाजात झालेला गैरसमज कसा दूर करावा, याबाबत सुद्धा कार्यशाळेत मार्गदर्शन



होईल.'करो योग रहो निरोग' याप्रमाणे योगाची मदत घेऊन मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी या कार्यशाळेमध्ये पोषक वातावरण निर्माण करण्याचा हेतू आहे. यामध्ये अनेक योग विषयक विचारांवर उदा:बेरोजगारी, कौटुंबिक हिंसाचार, पाल्यांविषयी असलेली चिंता व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आर्थिक तंगीमुळे वाढलेला मानसिक दबाव या सर्व महत्त्वपूर्ण घटकांवर कार्यशाळेच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करणे, हा यामागील उद्देश आहे.

सदर कार्यशाळा योगाच्या माध्यमातून भावनिक आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी आदर्श जीवनशैलीचे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त नोंदणी करून या कार्यशाळेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

# ट्रान्सपोर्ट नगरातील गॅरेजला आग, ६ दुचाकी खाक

## शॉर्ट सर्किटने आग लागल्याचा संशय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** नागपुरीगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या ट्रान्सपोर्ट नगरातील एका गॅरेजला अचानक भिषण आग लागल्याने आगीत सहा दुचाकी खाक झाल्याने गॅरेजवाल्याचे सुमारे ४ लाखाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली होती. याबाबत माहिती मिळताच अग्निशमण विभागाने तात्काळ घटनास्थळ गाठून आगीवर नियंत्रण मिळविले. माहितीनुसार, हबीब नगरात लुकमान शाह हनिफ



शाह यांचे दुचाकी दुरूस्त करण्याचे गॅरेज आहे. अचानक गॅरेजमधून आगीचे डोंबच्या डोंब बाहेर येत असल्याचे दिसताच नागरिकांनी याबाबत तात्काळ अग्निशमण विभागाला



माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमण दलाचे केंद्रप्रमुख सैय्यद अन्वर, वाहन चालक नवेद खाने, फायरमन इमदाद खान, मुजाहिद्दोन, मो. निहाल, सुनील काकडे तातडीने बंबासह घटनास्थळी दाखल झाले. गॅरेजमध्ये मोठ्या प्रमाणात दुचाकी, दुचाकीमध्ये पेट्रोल, खाली पडलेले ऑईल असल्याने आगीने क्षणातच रौद्ररूप धारण केले. यावेळी घटनास्थळावर महावितरण च्या अधिकाऱ्यांना सुध्दा प्राचारण करण्यात आले. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी परिसरातील विज पुरवठा बंद केल्यानंतर अग्निशमण दलाच्या जवानांनी आगीवर चौफेर पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीमध्ये गॅरेजमध्ये दुरूस्तीसाठी आलेल्या ६ दुचाकी खाक झाल्याने गॅरेजचे मालक लुकमान शाह यांचे सुमारे ४ लाख रूपयांचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# जिनिंग प्रेसिंगचे संचालक सुधीर अढाऊ अपात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

तालुक्याच्या सहकार क्षेत्रात सहकार पॅनलची एक हाती सत्ता असून मद्य:स्थितीत सहकारात कुरघोडीचे राजकारण सुरु असतानाच जिनींग सींगचे परिवर्तन पॅनलमधील चालक सुधीर आढाऊ हे अपात्र झाले. या घडामोडीने जिनींग प्रेसीग संस्थेमधील विरोधकांचे संख्याबळ नऊवरुन आठवर आले आहे.

किसान जिनिंग ॲन्ड प्रेसींग सहकारी संस्थेच्या संचालक व सहकार गटाचे सदस्य संजय काळमेघ, अमोल पोटे, नंदकीशोर रेचे यांनी डिसेंबर २०२३ ला परीवर्तन पनलचे समिती सदस्य, संचालकांनी सुधीर अढाऊ यांचेविरुद्ध संस्थेमधील वेतिलेल्या लाभाच्या कारणाने त्यांच्या अपात्रतेची याचिका सहाय्यकनिबंधकांकडे दाखल केली होती. त्या याचिकेचा निर्णय लागला असून नियमान्वये अढाऊ हे कसुरदार समिती सदस्य झाल्याने ते किसान जिनिंग ॲन्ड प्रेसींग सहकारी संस्था मर्या. अंजनगाव सुर्जी र.नं.१३०३ या संस्थेचे समिती सदस्य (संचालक) म्हणून राहण्यास अपात्र झाले आहे. पुढील पाच वर्षाच्या मुदतीचा कालावधी समाप्त होईपर्यंत समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक केली जाण्यास, पुन्हा नामनिर्दिष्ट होण्यास. पुन्हा स्विकृत होण्यास वा पुन्हा निवडून येण्यास ते पात्र असणार नाही, असे आदेश सहायक निबंधक राजेश यादव यांनी दिले आहे. अपात्रतेच्या आदेशाबाबत आपल्याला काहीही माहीती नाही. उद्या कार्यालयात जाऊन माहीती घेतो, असे सुधीर अढाऊ यांनी सांगितले.

# छगन भुजबळ नाराज नाहीत, देवगिरीवरील बैठकींना नियमित हजेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती:** छगन भुजबळ ओबीसी समाजाचे ज्येष्ठ नेते आहेत. ते नाराज नाहीत, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावरील बैठकीला नियमित उपस्थित असतात, अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते आणि अन्न व औषध प्रशासन तसेच विशेष साहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

येथील विभागीय कार्यालयात आयुक्त प्रशासनाचा आढावा घेतल्यानंतर माध्यमांशी ते बोलत होते. ना. झिरवाळ म्हणाले, प्रत्येकावर आरोप केला जातो म्हणजे त्यांचा राजीनामा घ्यावा, असे होत नाही. ना. कोकाटे आमदार असताना त्यांच्यावर कधी आरोप झालेला नाही, मंत्री झाल्यावर आरोप केला जातो. त्यांनी न्यायालयात अपील केले असल्याने त्यांच्यावर दोष सिद्ध झालेला नाही. ना. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री बसून चर्चेअंती निर्णय घेतील, असे ते म्हणाले.

मेळघाटात २२ दिवसांच्या चिमुकल्याला चटके दिल्याच्या प्रकारावर बोलताना ते म्हणाले. आदिवासी समाजामधील अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविला जाईल. अज्ञानात बदल व्हायला हवा, असे ते म्हणाले. विशेष सहाय्य योजनेत लाभार्थ्यांची संख्या वाढ व्हायला हवी. आता डीबीटीने थेट त्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्यात येणार असल्याची माहिती ना. झिरवाळ यांनी दिली.

एफडीएद्वारा प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात येणार आहे. याद्वारे नमुन्यांचे अहवाल लवकर मिळतील आणि सदोष नमुन्यांवर कारवाई करता येईल. नागपूर येथील लॅब तयार झालेली आहे. महिनाभरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तिचे लोकार्पण होईल.

**१९० पदांच्या लवकरच एफडीएमध्ये नियुक्ती**

अन्न व औषध प्रशासनात बरीच पदे रिक्त आहेत. यासाठी विभागनिहाय आढावा घेत आहे. एमपीएससीद्वारा १२० पदांच्या परीक्षा घेण्यात आल्या. या पदांच्या नियुक्तीबाबत पाठपुरावा सुरू आहे. लवकरच ही पदे भरली जातील, असे ना. झिरवाळ म्हणाले.

# अमरावती बाजार समितीच्या चौकशी अहवालावर डीडीआरकडे सुनावणी सुरू

## जिल्हा उपनिबंधकांच्या निर्णयाकडे लक्ष




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमधील विविध ४४ लाखांच्या कामांची ई निविदा न करता नियमबाह्य कामे देणे, व स्वच्छता कंत्राटची नियमबाह्य मुदतवाढ आणि वाढीव दराने कंत्राट देणे आदीचा ठपका चौकशी अहवालात ठेवण्यात आल्याने सदरचा चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधकांकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे अहवालावर डीडीआरकडे सुनावणी सुरू आहे. मंगळवारी या प्रकरणी सुनावणी आटोपली असून पुढील सुनावणी पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे,

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनेक तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधकांनी चौकशी समिती गठीत केली होती. बाजार समितीमध्ये प्रशासकीय मान्यतेनुसार ४४ लाखांची कामे व तीन विद्युत कामांची मान्यता देण्यात आली होती. या कामांच्या ई निविदा काढणे क्रमप्राप्त होते. मात्र नियमबाह्या पध्दतीने सदरची कामे कंत्राटदारांना देण्यात आल्याचा आरोप तक्रारीतून करण्यात आला होता. चौकशीत या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात चुका असल्याचेही आढळून आले आहे. संचालक मंडळाची मंजुरी आदेशाला मंजुरात नाही, जाहीरात प्रसिध्दी पत्रामध्ये खोडतोड, निविदा प्रक्रियेत कायदेविसंगत कामाचा ठपका, कंत्राटदारांना ॲडव्हास देतांना अनेक प्रकारच्या चुका आढळून आल्याने यामध्ये गैरव्यवहार दिसून येत असल्याचाही ठपका बाजार समितीवर ठेवण्यात आला आहे. सदरचा अहवाल चौकशी समितीने जिल्हा उपनिबंधकाकडे पुढील कारवाईकरिता सुपुर्द केला आहे. त्यामुळे आता दोन्ही पक्षांची या संदर्भात बाजु एकून डीडीआर पुढील निर्णय देणार आहे. याकरिता डीडीआरकडून मंगळवारी देखील सुनावणी घेण्यात आली. या संदर्भात पुढील आठवड्यात सुनावणी होणार असल्याचे जिल्हा उपनिबंधकांनी सांगितले. त्यामुळे आता चौकशी अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

**संचालक मंडळ बरखास्त करण्याची तक्रार**

संचालक मंडळाने भाजीपाला मार्केटचे ३३ दुकाने फुट मार्केटचे २६ दुकाने व बडनेरा मार्केटचे १८ दुकाने वाटण्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कोट्यवधींचे उत्पन्न बुडाले आहे. सोबतच नियमबाह्य हंगामी कर्मचारी भरती, शेतकऱ्यांकडुन अडत वसुलीची लुट, नियमबाह्य वजन काट्याचा वापर, वाहनाचा गैरवापर, अवैध मातेरा वसुली, नियमबाह्य दुकान वाटप करुन ट्रान्सफर करणे असे गंभीर आरोप प्रशांत काळबांडे व निलेश विलास महल्ले यांच्याकडून सभापती, उपसभापतींसह संचालक मंडळावर लावण्यात आले आहे. त्यामुळे वरील आठ मुद्यांची सखोल चौकशी करुन दोषी संचालक मंडळावर शेतकरी विरोधी कार्य करीत असल्याचे व शेतकरी निधीचा दुरुपयोग तसेच पदाचा दुरुपयोग करीत असल्याचा ठपका ठेऊन पुढील सहा वर्ष निवडणुकीस अपात्र ठरवून, वसूलपात्र रक्कमेची वसुली करुन संचालक मंडळ बरखास्त करण्यात यावे, अशी तक्रार प्रशांत काळबांडे व निलेश महल्ले यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे केली आहे.

# बाजारात स्कार्फसह गॉगल्स अन् टोप्यांची वाढली मागणी

## सनकोट, सुती कपडे, दुपट्टे खरेदीसाठी गर्दी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

मागील काही दिवसांपासून उन्हाचा पारा वाढत असल्याने उन्हाचा बचाव करण्यासाठी साहित्यांची मागणी वाढली आहे. प्युअर कॉटनच्या सनकोटला अधिक मागणी आहे. स्कार्फपेक्षा स्टोल घेण्याकडे कल असून, स्टेपल व कॉटनचे स्टोल जास्त प्रमाणात घेतले जात आहे. स्कार्फ-स्टोलची मुलींमध्ये तर मुलांमध्ये गॉगल्स, टोप्या व दुपट्टे, रूमालांची क्रेझ दिसून येत आहे.

उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरातील तरूण-तरुणींची उन्हापासून बचाव करण्यासाठीतयारी सुरू झाली आहे. सनकोट, हँडग्लोव्हजची खरेदी होत असून, उन्हापासून बचावासाठी अनेक उपाय केले जात आहे. सूर्याच्या अतिनील किरणांचा त्वचेवर परिणाम होऊन अँलर्जीचे प्रमाण वाढते. काही प्रमाणात 'सनबर्न'चा देखील त्रास होतो. उन्हापासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी, हँडग्लोव्हज, स्कार्फ, स्टोल यांचा तरुणी वापर करतात. त्याचप्रमाणे विविध बँडच्या सनस्क्रीन लोशनचा वापरदेखील केला जातो. दुपारच्या वेळी बाहेर पडताना मुली, महिला सनकोट, स्कार्फचा वापर करतात. याशिवाय मुले फॅन्सी टोपी, पांढरे सुती कपडे आणि दुपट्टा, गॉगल्स खरेदीसाठी गर्दी करत आहे.उन्हाळ्याला सुरुवात झाली आणि बाजारात समर कलेक्शनचे विविध प्रकार दाखल झाले. उन्हाळा आणि सनकोट असे समीकरणच तयार झाल्याने बाजारात नानाविध सनकोट पाहायला मिळत आहे. यात प्युअर कॉटन, बिझी लिझी, टेरिकॉट, सेमिटेरिकॉट, समरकूल मटेरियल असे प्रकार उपलब्ध आहे. स्टेपल, कॉटन, स्पन आदी प्रकारातील स्कार्फ आणि स्टोलला मागणी आहे. ३५ ते ३०० रुपयांपर्यंत स्टोल, तर ३५ ते १५० रुपयांपर्यंतचे स्कार्फ उपलब्ध आहे. टोप्यांमध्ये ४० ते२०० रूपयांपर्यंत विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. रुमाल ५० ते २०० रुपयांपर्यंत विकले जात आहे. गाडी चालवताना आवश्यक असलेले हँडग्लोव्हज देखील खरेदी केले जात आहे. शहरातील अंबा देवी रोड, राजकमल चौक, इतवारा बाजार, जयस्तंभ, नवाथे, गाडगे नगर, पंचवटी, गर्ल्स हायस्कूल चौक, बियाणी, विद्यापीठ चौक, ईर्विन, नमुना गल्ली, येथे स्कार्फ, स्टोल विक्रीच्या गाड्या आहेत. सूर्याच्या अतिनील किरणांचा त्वचेवर परिणाम होऊन अँलर्जीचे प्रमाण वाढते. यावर तरुणाईची गर्दी होत असताना दिसून येत आहे

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

## गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीवर अत्याचार करण्यात आला. त्यातून तिला गर्भधारणा झाली. मात्र, ऐनवेळी तिला लग्न करण्यास नकार देण्यात आला. ही घटना बुधवार, २६ फेब्रुवारी रोजी गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

नीलेश रामदास खोब्रागडे (२४) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचेनाव आहे. पीडित तरुणी ही तिच्या आईसोबत एका गावात राहत होती. तेथे तिची आरोपी नीलेशसोबत ओळख झाली. ते एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यांच्यात बोलचाल सुरू झाल्यावर दोघांनीही लग्नाच्या आणाभाका घेतल्या. या काळात नीलेशने पीडित तरुणीला गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील एका कॉलनीत भाड्याची रूम करून दिली. तोही तेथे राहू लागला. त्यावेळी त्याने पीडित तरुणीच्या गळ्यात खोटे मंगळसूत्र घातले. तसेच लग्नाचे आमिष दाखवून त्याने तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यातून तिलापीडितेला गर्नकारणा गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील घटना गर्भधारणा झाली. त्यामुळे तिने याबाबत नीलेशला माहिती दिली. त्यावेळी त्याने मला हे बाळ पाहिजे, अशी बतावणी तरुणीकडे केली. मात्र, त्यानंतर नीलेशने पीडित तरुणीसह होणाऱ्या बाळाला मान्य न करता तिच्यासोबत लग्न करण्याससुद्धा नकार दिला. नीलेशने लग्न करण्याचे आमिष देत आपली लैंगिक फसवणूक केल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने गाडगेनगर ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# अचलपूर नगरपालिका प्रसाधनगृहातील भिंतीवर दारूच्या बाटल्यांचा पडला खच

## जिल्ह्यातील 'अ' दर्जा प्राप्त; प्रशासनाच्या हलगर्जीपणा आला चव्हाट्यावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अचलपूर**

अमरावती जिल्ह्यातील 'अ' दर्जाची अचलपूर नगरपालिका प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे बेजबाबदार वापराच्या विळख्यात सापडली आहे. पालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या परिसरात जणू खाजगी मालमत्तेसारखा बेजबाबदार वापर केला जात आहे.

पालिकेच्या मुख्य इमारतीसमोर खाजगी वाहनांची पार्किंग केली जाते. तर बाजूच्या गार्डनमध्ये काही युवक नियमितपणे संशयास्पद अवस्थेत आढळतात. मात्र, या बेजबाबदार वर्तनाचा कळस म्हणजे नगरपालिकेच्या प्रसाधनगृहातील भिंतींवर पडलेला दारूच्या बाटल्यांचा खच. विशेष म्हणजे, प्रशासकीय कार्यालयात येणारे नागरिक आणि कर्मचारी याच प्रसाधनगृहाचा वापर करतात. तिथे पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था असतानाही मोठ्या प्रमाणावर दारूच्या बाटल्या सापडत असल्याने सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.पालिका इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर चौकीदार असतानाही प्रशासकीय इमारतीच्या परिसरात अशा घटनांना का वाव मिळतोय, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

# नेरपिंगळाई त उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणि टंचाईचे चटके

## योग्य प्रेशर नसल्याने कुणाच्या हौदात भरपूर पाणी तर कुणाची घागर चक्क रिकामी
## सरपंच्याचे दुर्लक्ष : आणखी पाण्याच्या टाकीची गावाला गरज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नेरपिंगळाई**

नेरपिंगळाई त उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणि टंचाईचे चटके येणाऱ्या पाण्याला योग्य प्रेशर नसल्याने कुणाच्या हौदात भरपूर पाणी तर कुणाची घागर चक्क रिकामी आणखी पाण्याच्या टाकीची गावाला गरज समस्या कडे सरपंचाचे दुर्लक्षनेरश्रपिंगलाई गावाचे पानी स्वच्छता आरोग्य साफ सफाई रस्ते कचऱ्याची विल्हेवाट अनेक काम काज ग्रामपंचायत अंतर्गत चालतात त्यात उन्हाळा लागण्या पुर्वी पाण्याचे नियोजन करणे गरजेचे असते मात्र गावात असणारे पाण्याचा साठा करणाऱ्या पाण्याचा टाक्या समस्या चा भोवऱ्यात असून शिक्षक कॉलनी मधली टाकी आजारी असून ज्या ठिकाणीं ग्रामपंचायत काम काज चालते ती पाण्याची टाकी चक्क डिस्मेंटल असून त्यांच्या खाली ग्रामपंचायत असून अनेक नागरीक ग्रामपंचायत मध्ये येजा करतात आणि गावातील बाकि पाण्याच्या टाकीची क्षमता कमी असल्यानी योग्य पाणी साठवणूक नसल्याने व गावात आणखी पाण्या च्या टाकीची गरज असल्यामुळे उन्हाळ्याची चाहूल लागताच कधी सहा दिवसांनी तर कधी पाच दिवसांनी कधी आठ दिवसांनी गावाला पाणी पुरवठा केला जातो त्यात हि योग्य प्रेशर नाल्यानी कुणाच्या हौदात भरपूर पाणी तर कुणाची घागर रिकामी ही परिस्थिती दिसून येते त्यात ही गावाला मेहनती ग्रामसेवक्ष लाभल्या वर पाण्याच्या. समस्या कडे नवीन पाणीटाकीउपलब्ध करून देण्यास सरपंच का दुर्लक्ष करीत आहे हा जनतेला प्रश्न पडत आहे ही समश्या शासन दरबारी मांडावी हि मागणी जोर धरत आहे.



# स्वराज्याचे सुराज्य कसे करता येईल यासाठी तरुणांची भूमिका महत्वाची

## बच्चू कडू यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अचलपुर**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची निर्मिती केली त्याप्रमाणे तरुणांनी रक्तदान चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वराजाचे सुराज्य करावे,यासाठी तरुणांची भूमिका महत्वाची असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बच्चु कडू यांनी केले.स्वार्थासोबत परमार्थही करावा, ही संतांची शिकवण अंगी आणावी,असेही पुढे बोलतांना बच्चु कडू म्हणाले.संत गाडगेबाबा ज्ञानसागर वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त गाडगे बाबा पानेरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी उद्धाटक स्थानावरून ते बोलत होते.अधक्षस्थानी विजय थवानी होते.सर्वप्रथम महापुरूषांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.बच्चु कडूंच्या उपस्थितीत ५४ विद्यार्थ्यांनी या शिबिरामध्ये सहभाग घेऊन रक्तदान केले.यामध्ये आकाश बोंडे, शिरीष उमाळे, आदित्य कुकडे, सुमित गुर्जर, अजय चव्हाण, प्रणव लहाने, नितीन गुप्ता, सुमित कोथले, अल्पेश निचत, विकास देशमुख, शिवम कोयते, ऋतिक वानखडे, अभिजीत जाधव, तेजस गाठे, भूषण सावरकर, दिनेश कळसकर, वैष्णवी मोटधरे, रेणुका देशमुख, सुमित वन्हेकर, प्रगती आवनकर,अमित लहाने,निखिल खारपकर,सचिन धाबेकर,विजय धांडगे,अंकित कडू,रुषभ चित्रकार,रुपेश गवई,यश दैनिककर,गौरव लवटे,रजत राऊत, नागोराव राऊत,राम कस्तुरे,तेजस घोडे,संदिप गुळदे,अंकुश सरोदे,गोपाळ वालखडे,संजय पवित्रकर,मंगेश लोखंडे,दिपक पोटे,अमित झाडे,दिपेश काकोडे,रुषिकेश वढाळे,प्रणव लहाने, रामरतन झाडे आदींनी सहभाग घेतला.संचलन सुमित कोठोळे तर आभार प्रदर्शन गोकुल पळसपगार यांनी केले.

# सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी येथे अध्यात्म व मानवतावाद विषयावर राष्ट्रीय परिषद

## जेएनयु चे डॉ शरद बावीस्कर असणार बीज भाषक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अंजनगाव सुर्जी**

श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी येथे ७ मार्च ला भारतीय साहित्यातील समग्र चेतना व मानवतावाद या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. सध्याच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय ज्ञान प्रणाली ला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून त्यावर सखोल मंथन व प्रबोधन होण्याच्या दृष्टीने ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. यात जेएनयू विद्यापीठातील फ्रेंच फिलॉसॉफी चे प्राध्यापक व मराठी साहित्यातील बेस्ट सेलर 'भुरा ' आत्मकथनाचे लेखक डॉ शरद बाविस्कर हे बीजभाषक असणार आहेत. त्याचप्रमाणे कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ कृष्णकुमार पांडे हे उद्घाटक असणार आहेत. मल्टी डीसीप्लीनरी व मल्टी लिंगुअल असलेल्या या परिषदेत शिक्षण क्षेत्रातील विविध विषयाचे प्राध्यापक शोध निबंध सादर करणार आहेत. संत वांङ मय, निसर्ग जाणिवा, मानवतावाद,वेद, उपनिषद,बुद्धिस्ट लिटरेचर , वेदिक सायन्स, आर्ट्स, कल्चर पासून तर पतंजली योगदर्शन या विविध विषयांवर, संशोधकांमध्ये चर्चा रंगणार आहे. या परिसरातील सहा महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही राष्ट्रीय परिषद संपूर्ण संत गाडगेबाबा विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये आकर्षणाचे केंद्र ठरलेली आहे. या राष्ट्रीय परिषदे करिता नोंदणी करून त्यात शोधनिबंध सादर करण्याचे आव्हान शिक्षण क्षेत्रातील सर्व तज्ञ शिक्षक मंडळीला केले जात आहे.

# पीएमश्री जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना अद्यावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिकविणारे आदर्श शिक्षक अंकुश गावंडे

अरुण जोशी

## जगातील शिक्षक व विद्यार्थ्यांसोबत येथील विद्यार्थी साधतात संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील दाभा या गावातील पि एम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील अंकुश गावंडे हे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण , अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाचे धडे देऊन त्यांचा गुणवत्तापूर्ण विकास साधत आहे.त्यांच्या कार्याची दखल घेऊन उपक्रमशील, प्रयोगशील असलेल्या अंकुश गावंडे यांना महाराष्ट्र शासनाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

३ हजार लोकसंख्या व पहिली ते सातवा वर्ग असलेल्या शाळेत अंकुश गावंडे यांनी अनेक नाविन्यपूर्ण असे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा गुणवत्तापूर्ण विकास घडवून आणला आहे. अतिशय रंगरंगोटी करून या बोलक्या शाळेत नवनवीन तंत्रज्ञानाचा ते आपल्या अध्यापनात वापर करतात, विद्यार्थ्यांना प्रभावी व मनोरंजक होईल असे अध्यापन करतात.त्यांनी आपल्या वर्गात इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन technology ...ICT कॉर्नर बनविला आहे व कॉर्नर अंतर्गत विविध ICT आधारित उपक्रम राबवित आहे. विद्यार्थ्यांचे इंग्रजी बोलण्याचे व संवाद साधण्याचे कौशल्य विकसित व्हावे या करिता त्यांनी अलेक्सा डॉल बनविली व टॉल्किंग विथ अलेक्सा हा उपक्रम सुरु केला या अलेक्सा सोबत विद्यार्थी इंग्रजी संवाद करतात. विद्यार्थी स्वतः दररोज गुगल वर इंग्रजी चे प्रश्न सर्च करतात व ते प्रश्न अलेक्सा ला विचारतात. अलेक्सा प्रश्नांचे उत्तर देते यामुळे त्यांना इंग्रजी बोलण्याचा सराव होतो व त्यांच्या मनातील भीती निघून जाते आणि इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो. ग्रामीण भागातील या शाळेत विद्यार्थी फरासपणे इंग्रजी बोलतात. अंकुश गावंडे यांनी व्हर्चूअल रिऍलिटी हा उपक्रम रबवीला. त्यासाठी त्यांनी Virtual Reality Box स्व खर्चातून आणले ज्यामुळे विद्यार्थ्यांना अतिशय उत्कृष्ट असे आभासी अनुभव घेता येतात.जसे क्लासरूम मधूनच ते विद्यार्थ्यांना स्काय डायविंग, सोलर सिस्टीम, समुद्र मंथन ,अंतराळ वारी, जंगल





सफारी, म्युझिअम सफारी असे अनुभव देतात. या सोबतच अंकुश गावंडे हे ऑगमेंटेड रिऍलिटी हा नावीन्यवपूर्ण उपक्रम राबवीत असून या तंत्रज्ञानाचा अध्ययन अध्यनात प्रभावी वापर करतात. विद्यार्थ्यांना पचन संस्था, आंतरेंद्रिये (हृदय, मेंदू व इतर), अन्न साखळी,सूर्यमाला शिकवितात. तसेच पाठ्यपुस्तकातील इतर विविध संबोध या तंत्रज्ञानाने स्पष्ट होतात. त्यांना AR. ऑगमेंटेड रियालिटी वर कार्य करणाऱ्या णघ, USA व न्युझिलंड येथील आंतरराष्ट्रीय संस्थांनी –ालरीरवी म्हणून सन्मानित केले आहे.जगातील मोजक्या शिक्षकांना हि पदवी दिली जाते.त्यांनी पाठ्यपुस्तकातील चित्रांना AR मध्ये रूपांतरित करून तसे AR ऍप शासनाकडून बनवून शिक्षकांना देण्यात यावे असा प्रस्ताव सुद्धा शासन स्तरावर सादर केला आहे. शासनाने त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.अंकुश गावंडे यांनी कोरोना काळा पासून वर्ल्ड वाईड ग्रीन प्रोजेक्ट हा आंतराष्ट्रीय प्रकल्प सुरु केला. ज्या मध्ये सध्या ५० पेक्षा जास्त देशातील शिक्षक व विद्यार्थी जुळले आहेत. अंकुश गावंडे यांनी एकूण ५० देशातील शिक्षक विद्यार्थी या प्रकल्पा साठी समन्वयक जोडले आहेत.या प्रकल्पाचा मुख्य उद्देश जागतिक पर्यावरण जनजागृती तसेच वृक्षारोपण व संवर्धन हे आहे.या सोबतच या प्रकल्प मार्फत विविध कार्यक्रम व शैक्षणिक उपक्रम घेतले जातात. शैक्षणिक देवाण घेवाण, आंतरराष्ट्रीय वेबिनार आयोजित केले जातात, education in My country हा कार्यक्रम घेतला जातो ज्या मध्ये विविध देशातील शिक्षक त्यांच्या देशातील शिक्षण पद्धती कशी आहे हे स्पष्ट करतात. चित्रकला,वक्तृत्व, इको फॅशन, अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जातात.वृक्षारोपण कॅम्पेन आयोजित केले जातात. त्यासाठी ६ आठवड्याचा नाविन्यपूर्ण प्रयोग केला जातो.ग्लोबल एज्युकेशन अँड कल्चर एक्सचेंज प्रोग्राम – ग्लोबल क्लासरूम कनेक्ट हा उपक्रम सुद्धा राबवीत आहेत.या मध्ये वर्गातून दुसऱ्या देशातील क्लासरूमला ऑनलाईन माध्यमातून जोडले जाते. यात दोन्ही देशातील विद्यार्थी एकमेकांच्या शैक्षणिक ऍक्टिव्हिटी सादर करतात. आपापल्या देशातील सण, समारंभ, संस्कृती, वेशभूषा यांचे सादरीकरण व आदान प्रदान करतात. अंकुश गावंडे यांनी व्हिएतनाम, रोमानिया सह अनेक देशातील क्लासरूम ला आपला वर्ग जोडून हा उपक्रम राबविला आहे.शाळेतील त्यांचे विद्यार्थी गुणाकार भागाकार वजाबाकीच्या अगणित संख्याच्या गणितीय क्रिया सुद्धा करतात.

**ज्ञानमंथन – शिक्षणाच्या प्रवासात संवादातून साक्षात्कार**

हा मुलाखत मालिकेचा कार्यक्रम सुद्धा अंकुश गावंडे यांनी सुरु केला आहे.या उपक्रमा मुळे विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य विकसित होते. या सोबतच विद्यार्थ्यां द्वारे विविध देशातील यशस्वी व्यक्तींच्या व शिक्षकांच्या मुलाखती सुद्धा घेण्यात येतात.विविध खउढ तंत्रज्ञानाचा वापर करून अध्ययन अतिशय प्रभावी होते याचे सादरीकरण अंकुश गावंडे यांनी राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण, शिक्षण आयुक्त, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई व संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांच्या समक्ष केले व असे खउढ साहित्य असणारी खउढ पेटी राज्यातील सर्व शाळांना मिळावी असे आवाहन केले. आणि अंकुश गावंडे यांचा हा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यातील सर्व शाळांमधे राबविण्यात येईल असे आश्वासन दिले.गुणवत्तापूर्ण शिक्षण उपक्रमाची दखल घेऊन दाभा येथील जिल्हा परिषद शाळेची पि एम श्री (प्रधान मंत्री स्कुल फॉर रायझिंग इंडिया) झचडक्ख्ख म्हणून निवड झाली आहे. हा केंद्र शासनाचा उपक्रम आहे. यात केंद्र शासनाकडून शाळेच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी विशेष निधी येतो या मध्ये जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातून एकमवे या शाळेची निवड झाली आहे. शाळेत राबविण्यात येणारे शैक्षणिक संशोधन व उपक्रम बघण्यासाठी अधिकार्यांसह परिसरातील व जिल्ह्या बाहेरील शाळा महाविद्यालये भेटी देतात.

तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा –२ मध्ये या शाळेची अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक देऊन निवड करण्यात आली आहे.

देशातील ग्रामीण भागातील शाळेत अंकुश गावंडे सारखे नावीन्यपूर्ण व प्रयोगशील उपक्रम राबविणारे इनोव्हेटिव्ह शिक्षक लाभले तर या तंत्रज्ञांच्या युगात आपला देश जागतिक पातळीवर एक वेगळा ठसा उमटविल्या शिवाय राहणार नाही...असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# संशोधनात निरिक्षण महत्वाचे - डॉ. किर्तीकुमार रणदिवे

## विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

जगामध्ये मोठए प्रमाणावर संशोधन सुरु आहे. मानवी जीवनाला सुकर करण्याकरीता समाज व देशाच्या विकासासाठी संशोधन महत्वाचे आहे. उदयोन्मुख संशोधकांनी संशोधन करतांना निरिक्षण करणे महत्वाचे असून त्या तथ्यांवर संशोधन होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागाचे प्रा.डॉ. किर्तीकुमार रणदिवे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान संवाद परिषद, डी.एस.टी., भारत सरकार आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ फेब्रुवारी ते ५ मार्च, २०२५ दरम्यान राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व एनएसडी – २०२५ कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गजानन मुळे उपस्थित होते.



उद्घाटन झाल्याची घोषणा करून डॉ. किर्तीकुमार रणदिवे पुढे म्हणाले, आज सर्वच क्षेत्रात संशोधन महत्वाचे झाले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शोध लागलेत. या शोधाचा मानवी जीवन समृद्ध करण्याकरीता उपयोग व्हायला पाहिजे. १९४० पूर्वी अणुबॉम्बचा शोध सुद्धा लागला. मानवी समुदायावर संहार करण्यासाठी त्याचा गैरवापर झाला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्याथ्र्यांना आता नवनवीन कौशल्य मिळणार आहे, त्यामुळे रोजगार निर्मिती सुद्धा मोठए प्रमाणावर होणार असून विद्याथ्र्यांनी नवीन कौशल्य व तंत्रज्ञान आत्मसात करायला हवेत. आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष अंमलात आणता आला पाहिजे, हे शिक्षणातून आज अपेक्षित आहे.

राष्ट्र विकासासाठी शासनस्तरावर जलद प्रयत्न सुरु आहेत, त्यामध्ये विद्याथ्र्यांचा सहभाग सुद्धा महत्वाचा आहे. स्टार्टअप सुद्धा मोठए प्रमाणावर होत आहे. भविष्यात आमचा विद्यार्थी जगाच्या पाठीवर सर्वात पुढे असेल, असे सांगून राष्ट्रीय विज्ञान दिवसामध्ये मोठए प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन सुद्धा त्यांनी याप्रसंगी केले.अध्यक्षीय भाषणात प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, तंत्रज्ञान अद्ययावत होत आहे, त्यामुळे संशोधनाची दिशा सुद्धा अद्ययावत होत आहे. दररोज होणारा तंत्रज्ञानातील बदल लक्षात घेता भविष्यात तंत्रज्ञानामध्ये आणखी मोठे बदल होणार आहेत. विकासाकरीता अनेक नवनवीन तंत्रज्ञानाचा आज उपयोग होत आहे. मग ते बांधकाम क्षेत्र असो वा आरोग्य क्षेत्र. तंत्रज्ञानाचा संशोधनाचा उपयोग मानवी जीवनाकरीता होत असून कोरोनावर निघालेल्या लसीमुळे अनेक मनुष्याचे प्राण वाचू शकले. एन.एस.डी. निमित्ताने पाच दिवस विविध स्पर्धांचे आयोजन होणार असून त्यामध्ये विद्याथ्र्यांचा जास्तीतजास्त सहभाग अपेक्षित आहे. तसेच शिक्षकांनी सुद्धा मोठए प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व भारतरत्न डॉ.सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी शाल व स्मृतिचिन्ह देवून डॉ. किर्तीकुमार रणदिवे यांचा सत्कार केला. प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गजानन मुळे यांनी कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट करुन पाच दिवस होणाया कार्यक्रमाची रुपरेषा सादर केली तसेच पाहुण्यांचा परिचय करुन दिला. संचालन प्रा. हर्षा देशमुख यांनी, तर आभार डॉ. कपिल कांबळे यांनी मानले.

# कॉँग्रेसचे मनपाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या मांडून आंदोलन

## व्याजाचा परतावा परत करण्याची शहर कॉँग्रेस पक्षाची मागणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

गेल्या एक–दीड महिन्या अगोदर शहरातील साफसफाईचा उडालेला बोजवारा आणि वाढीव मालमत्ता कर याबाबंत आयुक्त यांचेसोबत काँग्रेसच्या शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती परंतु तेव्हा मात्र मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी कॉँग्रेसच्या शिष्टमंडळाच्या बैठकीत सर्व मुद्यांवर योग्य कार्यवाही करण्याची हमी दिली होती. मात्र अजूनही शहरातील स्वच्छतेचा कारभार विस्कळितच राहलेला आहे. शहरातील असुरळीत मूलभूत सुविधा, शहरातील साफसफाईचा उडालेला बोजवारा त्यामुळे शहरात वाढते रोगराईचे साम्राज्य अजूनही जैसे थे आहे, तसेच शहरातील नागरिकांचे थकीत असलेले कर त्यावर व्याज आकारण्यात येणार नाही. परंतु शहरातील जबाबदार असंख्य नागरिकांनी वेळेवर भरलेला कर आणि याअगोदर थकीत असलेला कर व्याजासहीत भरलेला आहे त्यांचे काय चुकलेले आहे? म्हणुन शहरातील ज्या – ज्या नागरिकांनी वेळेवर भरलेले पैसे तसेच व्याजासाहित मालमत्ता कराची केलेली भरणा त्यांना मालमत्ता करावर जे व्याज आकारण्यात आलेले आहे ते शहरातील नागरिकांना परत करण्यात यावे करिता कॉँग्रेसचे अमरावती महानगरपालिकेवर महाराष्ट्र शासन आणि प्रशासन विरोधात जाहीर निषेध आंदोलन केले.

कमिशनखोर अधिकारी जे आहेत कुठलीही स्वच्छता न बघता ठेकेदारांचे बिल काढतात याबाबतीत कॉँग्रेसपक्षाने पहिल्या दिवसापासूनच आग्रही मागणी धरून ठेवलेली होती.महिन्याभऱ्या अगोदर झालेल्या कॉँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाच्या बैठकीत याबाबतीत आयुक्तांनी आश्वासन दिले होते की,साफसफाईच्या कंत्राटात ५५ मनुष्यबळाचा वापर करण्यात येणार आहे तथापि राजकीय दबावाखाली ५५ मनुष्यबळाचा वापर याअटीची अंबलबजावनी महानगर पालिकेकडून घेण्यात आलेली नव्हती त्यामुळे आज शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आंदोलनादरम्यान आयुक्तांसोबत झालेल्या बैठकी दरम्यान साफसफाईच्या कंत्राटात ५५ मनुष्यबळाचा वापर ही अट टाकून त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील तसेच ५५ लोक हे हजेरीवर हजर ठेवण्याच्या बाबतीत त्याला सक्ती करण्यात येईल अश्या प्रकारचा निर्णय आंदोलनकर्त्यांच्या समोर जाहीर केला.सदर निर्णय जाहीर झाल्या नंतर याबाबतीत अमरावती शहरातील सर्व सुजान नागरिक,लोकप्रतिनिधी व स्वच्छतेकरिता लढणारे जे नागरिक आहेत त्यांनी दररोज ठेकेदाराच्या हजेरीवर हजर राहून ५५ कामगार त्याठिकाणी उपस्थित होतात की नाही याबाबतच्या कॉँग्रेस पक्षाच्या आंदोलनात तथा संघर्षात सहभागी व्हावे आणि आपल्या वार्डाची,आपल्या प्रभागाची, आपल्या परिसराची स्वच्छता करून घेण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण काम अमरावती शहरातील नागरिकांनी पार पाडावे असे आवाहन अमरावती शहर कॉँग्रेसचे अध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,माजी महापौर अशोक डोंगरे,माजी नगरसेवक बाळासाहेब भुयार,माजी नगरसेवक मुन्ना राठोड,महिला कॉँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे यांनी केले आहे.याप्रसंगी संजय वाघ,प्रदीप हिवसे,सलीम बेग,धीरज हिवसे,विजय वानखडे,सुनील जावरे,सादिक शाह,गजानन जाधव,प्रशांत महल्ले,अरुण जयस्वाल,शोभा शिंदे,सुजाता झाडे,आस्मा परवीन,वंदना थोरात,अपर्णा मकेश्र्वर,लक्ष्मी अहिरे,आरती पिंपळे,भारती क्षीरसागर, किर्तीमाला चौधरी,पुष्पा वानखडे,अस्मिता बनसोड,राजीव भेले,बी.टी.अंभोरे,समीर जवंजाळ, निलेश गुहे,वैभव देशमुख,संकेत कुलट,संकेत साहू,शिवानी पारधी,प्रदीप अरबट, सतीश मेटांगे,संजय बोबडे, प्रकाश पहुरकर,श्रीधर पुरोहित, नाना बारबुद्धे,रवींद्र शिंदे,सतीश काळे,नजीर खान बिके, हिरामण गावंडे,विजय बर्वे,गोपाल हिवराळे,अश्फाक खान,अज्जू भाई,पंकज मांडळे,गुड्डू हमीद,विकी वानखडे,सौरभ तायडे,गजानन राजगुरे,नवशाद भाई,संजय पहुरकर,शुभम भुयार,अजय कुबडे,नवीन वाघ, अजय तायडे,अतुल काळबेंडे, राजू मसराम,गजानन इंगोले, प्रा.अनिल देशमुख,अजीम भाई यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा

## लाडू, फुलके, वडे,ढोकळा, चकल्या,यांच्यासह अनेक खमंग पदार्थांचे सादरीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धामणगाव रेल्वे**

येथील शिक्षण विभाग पंचायत समितीतर्फे हिराबाई गोयनका विद्यालयात तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा शुक्रवारला (ता.२८) घेण्यात आली.यात तालुक्यातील शाळेतील प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत कार्यरत तालुक्यातील सात केंद्रातील स्वयंपाकी महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.यात लाडू, फुलके, वडे,ढोकळा, चकल्या, केक, पापड,भाकरी,लाडू,मोदक, पेज, पुरी,शिरा,केक यांच्यासह खमंग पदार्थांचे सादरीकरण करण्यात आले.प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत तालुक्यातील शिक्षण विभाग पंचायत समितीतर्फे हिराबाई गोयनका कन्या विद्यालयात तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा घेण्यात आली पाककृती स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी हिराबाई गोयनका कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनीता देशपांडे ह्या होत्या.तर उद्घाटक म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब मुंदे हे



उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून गटसमन्वयक धीरज जवळकार,शिक्षण विस्तार अधिकारी मोहन देशमुख,पोषण आहार अधीक्षक अरुण चव्हाण, केंद्र प्रमुख जगदीशकुमार सिरसाट,कुमुद गडलिंग, डी.एस.राठोड,प्रफुल्ल डाफ, हिराबाई गोयनका कन्या विद्यालयाचे उपमुख्याध्यापक बाळू राठोड,जयश्री खडसे व आदी उपस्थित होते.प्रास्तविक पोषण आहार अधीक्षक अरुण चव्हाण यांनी केले.संचालन केंद्र प्रमुख डी.एस.राठोड यांनी केले तर आभार वरूड बगाजी शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र काळे यांनी मानले.

या स्पर्धेत नगर परिषद भिकराज गोयनका कन्या विद्यालयातून सीमा श्रीवास,प्राची तिरमारे, अंजनसिंगी येथील शीला कांबळी,वरूड बगाजी येथील सारिका कंगाले,शीला नखाते, झाडा येथील मंदा येवले,मंगला येवले,शेंदूरजना खुर्द येथील एकता विद्यालयातील वैशाली कुक्कडे, विटाळा येथील सुरेखा नान्हे,गोविंद नान्हे,तळेगाव दशास्त येथील वर्षा शेंडे,रेखा करडकर,नगर परिषद ओ.के.शाळेच्या सुमित्रा पडोळे, पदमा नेवारे,कावली येथील साविता मसराम, जळका

पटाचे येथील माला पिल्लारे,दुर्गा ठाकरे,हिराबाई गोयनका विद्यालयाच्या गायत्री नागोसे,अर्चना पवार,बोरगाव धांदे येथील ममता उईके,दिघी महल्ले येथील रुपाली चौधरी व कमला आमझरे व आदींचा सहभाग होता.

# मेळघाट मध्ये मोहफूल संकलनातून मिळतोय रोजगार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मेळघाट**

उन्हाळा सुरू होताच, मेळघाट परिसरात जंगलात मोहफूल संकलनाने वेग धरला आहे. यातून ग्रामीणांना चांगला रोजगार मिळत आहे.उन्हाळ्याच्या दिवसात जंगलात रानमेवा मिळतो. त्यात टेंभरं, चार, कवठ, मोहफूल, बेल यांचा समावेश आहे. सद्यःस्थितीत मोहफुलाला वेगळेच महत्त्व आहे. मोहफुलापासून केवळ मद्यच तयार होत नाही, तर एका अर्थाने ते आरोग्यवर्धकही मानले जाते, असे असले तरी मोहफूल वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल केली जात आहे.मोहाच्या झाडाला फुलोरा आल्यानंतर ग्रामीण भागातील नागरिक पहाटेच जंगलात जाऊन मोहफुलाचे संकलन करतात. यातून त्यांना चांगला रोजगारही मिळत आहे. मोहफूल घरी वेचून आणून त्या मोहफुलाला वाळवून त्याची साठवणूक करतात.(बॉक्स)३५ वर्षांपूर्वी खाद्यपदार्थात केला जायचा वापर३५ ते ४० वर्षांआधी मोहफुलाचा वापर मानवी खाद्यपदार्थात केला जायचा. अनेकदा मोहफूल खाऊनच दिवस काढले जात असत. मोहफुलापासून पानुऱ्या, मोहफुलाचे पुरण, वालाची डाळ व मोहफूल शिजवून खाल्ले जात असे. आंबाडीचे दाणे मोहफुलात मिसळवून त्याला तव्यावर भाजून खाल्ले जायचे. आजही मोहा फुलाला मोठी मागणी आहे.